# संपादकीय

## मराठी मरणार अशी भाषा गैरच!

एकविसाव्या शतकात पदार्पण करताना विसाव्या शतकाचे सिंहावलोकन करण्याचा प्रयत्न प्रत्येक ज्ञानशाखेत चालू आहे. मराठी साहित्यापुरता विचार करायचा झाला तर गेल्या शतकातले उत्तम ग्रंथ, महत्त्वपूर्ण लेखक, प्रमुख वाङ्मयीन प्रवाह आणि वाद, ग्रामीण दलित-स्त्रीवादी साहित्याने आलेली लोकाभिमुखता वगैरे बाबींचा परामर्श घेणे आवश्यक ठरते. साठोत्तरी साहित्याने विद्यापीठीय चौकटी निष्प्रभ ठरवल्या आणि साहित्याच्या अभिरुचीचे नियंत्रण-संवर्धन करण्याची आपल्याकडे असणारी मक्तेदारी विद्यापीठांच्या कालबाह्य अभ्यासक्रमांनी स्वकर्मानेच संपुष्टात आणली. विद्यापीठीय अभ्यासक्रमात समकालीन साहित्यप्रवाहांचा जागरुकपणे समावेश करण्याची तत्परता दाखवली न गेल्याने एकूणच भाषिक व्यवहारावरची विद्यापीठांची पकड सैल होत गेली. विद्यापीठाबाहेर विविध व्यक्ती आणि संस्था यांनी अनेक प्रकल्प राबवले; पूर्ण केले; परंतु त्यांची दखल घेण्याचे संकुचित वृत्तीच्या विद्यापीठांनी टाळले. आंदोलनांच्या रेट्यामुळे व राजकीय दडपणामुळे काही गोष्टींना सामावून घेणे विद्यापीठांना भाग पडले; परंतु त्याबाबत सापत्नभावाचीच वृत्ती अधिक जाणवावी असेच एकूण वातावरण राहिले. समीक्षाक्षेत्राचा विचार करताना या सर्व गोष्टींचा पडताळा येऊ शकतो.

नुकतेच पुणे येथे एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठातर्फे 'विसाव्या शतकातील मराठी समीक्षा' या विषयावर चर्चासत्र झाले. डॉ. नीलिमा गुंडी (काव्यसमीक्षा), डॉ. हरिश्चंद्र थोरात (कादंबरी समीक्षा), शुभदा शेळके (नाट्य समीक्षा), भारती निरगुडकर (कथा समीक्षा), रवींद्र किंबहुने, अविनाश सप्रे (सैद्धान्तिक समीक्षा), प्रा. रा. ग. जाधव (उपयोजित समीक्षा) यांचा त्यात सहभाग होता. प्राचार्य म. द. हातकणंगलेकर यांनी त्या चर्चासत्राचे उद्घाटन केले. कोसलाकार भालचंद्र नेमाडे यांनी समारोप केला. प्रा. हातकणंगलेकर यांनी आपल्या साहित्याची जात व पद्धत आणि पाश्चात्त्य साहित्यशास्त्रीय संकल्पना यांचा मेळ बसतो का असा प्रश्न उभा केला. भालचंद्र नेमाडे यांच्या देशीवादाच्या संकल्पनेचा त्यांनी खास निर्देश केला. संस्कृत साहित्यशास्त्र आणि पाश्चात्त्य साहित्यशास्त्र यांचा प्रभाव अधिक राहिला. भाषेच्या रचनेच्या अभ्यासातून संकेत व्यवस्था-चिन्हमीमांसा-शैली विज्ञान चिकित्सा याद्वारे आशयाचा विचार दुय्यम ठरवण्याचा एक प्रवाह समीक्षेत आला; मर्ढेकरांच्या



कलासाहित्यसिद्धांताद्वारे सौंदर्यशास्त्राबद्दलच्या पाश्चात्त्य-विशेषत: मर्ढेकरांच्या युरोपियन-नव्या प्रवाहांचा विचार आपल्याकडे आला; अस्तित्ववाद, आदिबंधात्मक समीक्षा, साम्यवादी, संरचनावादी, रूपवादी, वसाहतवादी, आधुनिकोत्तर वगैरे पाश्चात्त्य प्रणालींचाही आधार काही समीक्षकांनी घेतला. विलास सारंग यांनी जागतिकीकरणाच्या दृष्टीतून साहित्याचा विचार केला, रा. ग. जाधव यांनी समकालीन सांस्कृतिक संदर्भांना महत्त्व देऊन साहित्याचे आकलन करण्याचा विचार मांडला; पारंपरिक स्थिरबल समीक्षेचे उच्चाटन होत आहे, नवी समीक्षा येत आहे; पण तिची फलश्रुती काय असा प्रश्न प्रा. हातकणंगलेकर यांनी उपस्थित केला. आपला समीक्षा व्यवहार हा एकूण ज्ञानपरंपरेशी जोडला गेलेला नाही, आणि तडजोडवादी वृत्तीमुळे आपली समीक्षा ही समस्यांना जरी सामोरी गेली तरी निकराने भिडली नाही; संस्कृत वा पाश्चात्त्य समीक्षेच्या आधारे कामचलाऊ उत्तरे शोधण्यावरच तिचा भर राहिला; असा त्यांचा अभिप्राय पडला.

डॉ. चंद्रशेखर जहागिरदार यांनी बीजभाषण करताना महाराष्ट्रात ठोस सिद्धान्तन झाले नाही असे प्रतिपादन केले. मार्क्सवादी समीक्षा अभ्यासपद्धतीच्या अंगाने विकसित झाली असती तर नवे मॉडेल निर्माण झाले असते; आणि त्याचे उपयोजन होऊ शकले असते. समीक्षेला पर्याय म्हणून मर्ढेकरांचे सौंदर्यशास्त्र उभे राहू शकत नाही; देशीवादाची मांडणी झाली आहे पण त्यावर पुरेशी चर्चा झालेली नाही, पुस्तकांचा खप कमी असल्याने आपली एकूण वाङ्मयीन संस्कृती तेवढीशी चैतन्यशील राहिलेली नाही. वाचकच थंड असेल तर समीक्षा चर्चा यांत्रिकच होणार. वाचकांचा जागरूक हस्तक्षेप वाङ्मयीन संस्कृतीला पोषक ठरतो. तसा तो आपल्याकडे फारसा दिसत नाही. धार्मिक वा तत्सम कारणांमुळे काही गट अधूनमधून आंदोलनाचा मार्ग स्वीकारतात. (रिडल्स प्रकरण, अरुण शौरींचे वरशिपिंग फाल्स गॉड्स्, डॉ. वि. भि. कोलते यांचे लीळाचरित्र इ.) परंतु यातील मतप्रदर्शनांबद्दलची नाराजी दिसते.

या चर्चासत्राचा समारोप करताना डॉ. भालचंद्र नेमाडे यांनी समीक्षा आक्रमक बनली तरच ती साहित्य व संस्कृती वाचवू शकेल, मराठी समीक्षेने आपले निकष ठरवून ते वैश्विक बनविण्यासाठी इतरांवर लादले पाहिजेत असा सल्ला दिला. आपले निकष इतरांवर लादण्याचे सामर्थ्य आपल्या परपुष्ट परजीवी विचारवंतांत आहे असे नाही. इंग्रजांनी भारतावर राज्य केले म्हणून इंग्रजी भाषा व साहित्य यांचा भारतावर प्रभाव पडला. मोगल बादशहांनी उर्दू-फारसी भाषांचा अवलंब केल्याने येथील जनतेला त्यांचा वापर करणे भाग पडले. पाश्चात्त्यांवर आपले निकष लादण्याची प्रा. नेमाडे यांची भावना त्यामुळे कितपत वास्तववादी आहे याबद्दल शंका वाटते. साहित्यगुणांमुळे वा सिद्धांतांच्या वेगळेपणामुळे कदाचित् जागतिक पातळीवर आपली भाषा प्रभावी ठरू शकेल. तेवढी ताकद आपल्या समीक्षेत व साहित्यात आहे का, येईल का असा आपण अंतर्मुख होऊन विचार केला पाहिजे. अर्थात आपण भारतीयांनी रामायण-महाभारतासारखी प्रगत परंपरेतील महाकाव्ये आपल्याकडे असताना आपण महाभारताधिष्ठित वैश्विक निकष का मांडू नयेत असा त्यांचा जो प्रश्न

आहे तो विचारात घेण्यासारखा नक्कीच आहे.

''समीक्षा ही केवळ साहित्याचा विचार करीत नाही; तर ती समग्र जीवनाचा विचार करते. साहित्य व जीवन यांचा संबंध समीक्षा जोडते; तो जोडताना नवी मूल्ये शोधते. पुस्तक, लेखक, वाङ्मयप्रकार यांची सुव्यवस्थित श्रेणीव्यवस्था गृहीत धरून समीक्षकाने साहित्याचे आकलन-मूल्यमापन करायला हवे,'' असेही त्यांनी म्हटले.

मराठी भाषा मृत्युपंथाला लागली आहे असे आज अनेक लोक बोलतात. विलास सारंग यांनी मराठी मेली तर काय बिघडणार आहे असा सवाल केला होता; त्याचा संदर्भ देऊन डॉ. भालचंद्र नेमाडे यांनी डॉ. सारंगांवर झोड उठवली. असे म्हणणाऱ्या व्यक्तीला चांगला समीक्षक मानता येणार नाही असे सांगून त्यांनी सर्वसामान्य जीवसृष्टीचा दाखला देऊन म्हटले, ''प्रत्येक प्राणी आपण जिवंत राहावे, आपले वंशसातत्य राहावे यासाठी प्रयत्न करत असतो. ती त्याची मूलभूत प्रेरणा असते. तेव्हा आपली भाषा मरण्याची कल्पना स्वत:च प्रकट करणे हा आत्मघातकीपणा आहे. मराठी मरत नाही. मरणार नाही. ती इंग्रजी वा इतर शब्द स्वीकारून अधिक पुष्ट, प्रभावी व प्रवाही होईल अशी जिद्द आपण का बाळगू नये?'' असा विधायक दृष्टिकोन ठेवून मराठी माणसाने आपले ज्ञानक्षेत्र समृद्ध व व्यापक करायला हवे. आपले साहित्य व तत्त्वज्ञान सर्व जगाला आवाहनक्षम होऊ शकेल अशी आपली झेप असली पाहिजे.

विसाव्या शतकातील समीक्षेचे सिंहावलोकन करताना एकविसाव्या शतकात आपल्याला विश्वात्मक भरारी मारण्याची उमेद जागवणारे असे विचारमंथन स्वागतार्ह ठरावे.

संपादक



## कारगिलनामा

**अनु : नारायण आवटी**

कारगिलयुद्ध : सहजपणे टाळता येणारं, पण नेत्यांच्या आणि गुप्तहेर -यंत्रणेच्या हलगर्जीपणामुळं आपल्या सैन्यावर लादलं गेलेलं युद्ध. युद्धातील जवान आणि तरूण अधिकऱ्यांच्या प्रतिक्रियांची दहा पत्रकारांनी संपादित केलेला ग्रंथ म्हणजेच 'कारगिलनामा'

**किंमत : १६०रु. सभासदांना : १२०रु. पोस्टेज : १५रु.**



साहित्यवार्ता

## 'साहित्यातील देशीवादाच्या विचाराला सकारात्मक रूप द्यावे'

''विसावं शतक हे कलावादामध्ये अनेकविध प्रवाह येऊन मिळण्याचा साक्षीदार असणारं शतक ठरलं. काव्य, नाट्य, कादंबरी, कथा यांच्या समीक्षेबरोबरच सैद्धान्तिक समीक्षेबद्दलचेही वेगळे प्रवाह या शतकामध्ये निर्माण झाले'', असे ज्येष्ठ समीक्षक म. द. हातकणंगलेकर यांनी सांगितले. मराठी साहित्यावर होणाऱ्या पाश्चात्त्य लेखनप्रणालीच्या परिणामांती निर्माण झालेल्या निरनिराळ्या वादांबरोबरच विसाव्या शतकात भालचंद्र नेमाडेंसारख्या लेखकामुळे निर्माण झालेल्या देशीवादाचाही उल्लेख हातकणंगलेकर यांनी केला. 'विसाव्या शतकातील मराठी समीक्षा' या विषयावर एस. एन. डी. टी. विद्यापीठाने आयोजित केलेल्या दोन दिवसांच्या चर्चासत्राच्या उद्‌घाटन प्रसंगी ते बोलत होते. ज्येष्ठ समीक्षक के. ज. पुरोहित हे अध्यक्षस्थानी होते. इतिहासाचे भान असल्यामुळे देशीवाद ही संकल्पना चांगली असली तरी त्यातील नकारात्मक दृष्टिकोन टाळायला हवा, असे मत श्री. पुरोहित यांनी व्यक्त केले.

एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठाच्या कुलगुरू रूपाबेन शहा यांनी तरुण पिढी आणि वाङ्मय याबद्दलचे विचार मांडले. 'आजची तरुण पिढी चंचल आहे, तिच्याकडे एकाग्रता नाही हे म्हणणे चुकीचे आहे. मुंबईच्या गर्दीत लोकलमध्ये आपल्याला हवं ते नियतकालिक उभ्या उभ्या एकाग्रतेने वाचणारी तरुण मुलं पाहिली, की हे म्हणणे चुकीचे आहे, हे कळते. फक्त त्यांच्याकडची ही शक्ती सकारात्मक दिशेने वळवायला हवी' असे त्या म्हणाल्या. एस. एन. डी. टी. विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख विलास खोले यांनी प्रास्ताविक केले.

या दोन दिवसाच्या चर्चासत्रामध्ये भालचंद्र नेमाडे, रंगनाथ पठारे, राजन गवस, प्रभा गणोरकर, नीलिमा गुंडी, म. द. हातकणंगलेकर, अविनाश सप्रे, नागनाथ कोत्तापल्ले, ज्येष्ठ समीक्षक रा. ग. जाधव, वसंत आबाजी डहाके या अभ्यासकांची उपस्थिती होती.

## साहित्य, संस्कृती वाचविण्यासाठी समीक्षेने आक्रमक व्हावे : नेमाडे

''समीक्षा आक्रमक बनल्याशिवाय ती साहित्य व संस्कृती वाचवू शकणार नाही. मराठी समीक्षेने आपले निकष निश्चित करून ते वैश्विक बनवण्यासाठी इतरांवर लादले पाहिजेत,'' असे प्रतिपादन समीक्षक व कादंबरीकार प्रा. भालचंद्र नेमाडे यांनी पुणे येथे केले.

श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठाच्या मराठी विभागाने आयोजिलेल्या 'विसाव्या

शतकातील मराठी समीक्षा' या चर्चासत्राचा समारोप करताना ते बोलत होते.

समीक्षेने आक्रमकपणे आपल्या निकषांना वैश्विक बनविण्यासाठी प्रयत्न करावेत, असे सांगून ते म्हणाले, ''आपण नेहमीच पाश्चात्त्यांचे निकष स्वीकारीत आलो आहोत. पण भारतीय साहित्य परंपरेपेक्षा पाश्चात्त्य साहित्यपरंपरा अविकसित होती. ज्या वेळी त्या परंपरेत एखादेच महाकाव्य होते, त्या वेळी आपल्याकडे अनेक महाकाव्ये रचली गेली होती. त्यामुळे पाश्चात्त्यांचे महाकाव्य हा निकष न मानता आपले महाभारत हे वैश्विक निकष ठरले पाहिजे. आपले निकष देशी असायला हवेत.''

समीक्षा साहित्याचा विचार करीत नाही, तर ती जीवनाचा विचार करते. साहित्य व जीवन यांचा ती संबंध जोडत असते. या प्रक्रियेत नवी मूल्ये शोधण्याचा प्रयत्न ती करीत असते, असे त्यांनी सांगितले. समीक्षा कधी साहित्याची श्रेष्ठता-कनिष्ठता ठरवीत नाही, तर एखादी कृती साहित्य आहे, की नाही एवढेच ठरविते, असेही त्यांनी स्पष्ट केले. मात्र त्याबरोबरच समीक्षकाने श्रेणी व्यवस्था समीक्षकाला बिनदिक्कतपणे लावता आली पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.

मराठी मेली तर काय बिघडणार आहे, असा मुद्दा विलास सारंग यांनी अलीकडेच मांडला होता. त्याचा समाचार घेत प्रा. नेमाडे म्हणाले, ''मराठी मेली तर काय बिघडणार, असे ज्याला वाटते त्याला चांगला समीक्षक मानता येणार नाही. मराठीच हवी, ही आपली प्राथमिक कसोटी हवी. या जगातील एखादा जैविक घटक नष्ट होऊ नये, यासाठी पक्षी-वाघांसारखे प्राणी वाचविण्यासाठी आपली धडपड असते. मग ती धडपड आपली भाषा टिकविण्यासाठी का असू नये? मराठी मरत नाही, हेही लक्षात ठेवले पाहिजे. इंग्रजी शब्द स्वीकारून ती अधिक पुष्ट, अधिक प्रभावी व प्रवाही होईल.''

## अरुण शिंदे यांच्या कथासंग्रहाचे प्रकाशन

कथाप्रकाशनाची माध्यमे असलेली वाङ्मयीन मासिके बंद पडत असताना अरुण शिंदे यांच्या पूर्वप्रकाशित कथांचे पुस्तक निघत आहे, ही अतिशय समाधानाची बाब आहे, असे प्रसिद्ध साहित्यिक निरंजन घाटे यांनी पुणे येथे सांगितले.

श्री. शिंदे यांच्या 'बापमाणूस' या कथासंग्रहाचे प्रकाशन ज्येष्ठ पत्रकार आणि माजी खासदार अनंतराव पाटील यांच्या हस्ते झाले. ते म्हणाले, ''अरुण शिंदे यांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन खेळीमेळीने बघण्याचा आहे. त्यांच्या या दृष्टिकोनाचे प्रतिबिंब त्यांच्या कथांमधूनही दिसत असते.'' मीरा प्रकाशनचे प्रकाश भोईटे यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

## मराठीत तत्त्वज्ञानाच्या अंगाने विनोदाची समीक्षा कमीच झाली

''विनोदाची तत्त्वज्ञानाच्या अंगाने समीक्षा मराठीत कमीच झाली,'' असे प्रतिपादन ज्येष्ठ समीक्षक प्रा. गो. मा. पवार यांनी पुणे येथे केले.

पुणे विद्यापीठाचा मराठी विभाग व महाराष्ट्र साहित्य परिषद यांच्यातर्फे रा. श्री. जोग यांच्या स्मरणार्थ आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानमालेत बोलत होते. 'विनोदविषयक उपपत्तींची मीमांसा' हा त्यांचा विषय होता.



प्लेटो, ॲरिस्टॉटल, भरतमुनी, कांट, फ्रॉईड यांच्या उपपत्तींचा श्री. पवार यांनी सविस्तर आढावा घेतला. ते म्हणाले, ''विनोदाबाबत टोकाची मते आढळतात. विनोदाच्या संकल्पनेबाबत वाद आहे. आशय व अभिव्यक्ती या दोन गोष्टी महत्त्वाच्या मानल्या जातात. आशयाला महत्त्व देणाऱ्या उपपत्ती प्लेटो व ॲरिस्टॉटल यांनी मांडल्या. तर कांट, फ्रॉईडने अभिव्यक्तीला महत्त्वाचे मानले. व्यंगाच्या चित्रणामुळे विनोद निर्माण होतो, असे प्लेटोचे मत होते. सुखात्म जाणिवेला धक्का बसणार नाही, याची काळजी या सिद्धांतात घेण्यात आली आहे.''

''संस्कृत साहित्यात हास्यरसाचा विचार करण्यात आला आहे. अलंकार, भाषा, वेश यांतील विपरिततेतून हास्य निर्माण होते, असे मत यात मांडण्यात आले आहे. अयोग्य ठिकाणी प्रगट होणारा क्रोध व प्रेम यातूनही विनोदाची निर्मिती होते. मराठीत विनोदाची सकस परंपरा आहे. या साहित्याची समीक्षा रा. श्री. जोग, वा. ल. कुलकर्णी यांनी समर्थपणे केली. विनोदातून नेमके काय निर्माण होते, याची समीक्षा त्यात करण्यात आली.'' पुणे विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी स्वागत केले.

## आंबेडकरवादी साहित्यात समाजाला विचारप्रवृत्त करण्याची ताकद

''यापूर्वी जे जे दलित साहित्य निर्माण झाले त्यात आंबेडकरवादी विचारांचे वस्तुनिष्ठ विश्लेषण आले आहे का याबरोबरच त्यांचे वाङ्मयीन मूल्य, निकष आणि कलाकृतीची समीक्षा करण्यासाठीच मोहन वाघमारे यांनी 'आंबेडकरवादी साहित्य समीक्षा' हा ग्रंथ लिहिला आहे. त्यात त्यांनी आंबेडकरवादी साहित्याची भूमिका आग्रहीपणे मांडली आहे. याबाबत मतभेद होऊ शकतात पण या ग्रंथाच्या माध्यमातून त्यांनी समाजाला विचार करायला लावले आहे, आंबेडकरवादी चळवळीतला एक कार्यकर्ता म्हणून मी या ग्रंथाचे स्वागत करतो'', असे प्रतिपादन मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी पुस्तक प्रकाशन करताना केले.

लुम्बिनी प्रकाशनतर्फे मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमात प्रा. केशव मेश्राम आणि कथाकथनकार वामन होवाळ यांनी दलित साहित्याला वेगवेगळ्या नावांनी संबोधण्यात येते याबद्दल नाराजी व्यक्त केली. त्यावर बोलताना डॉ. भालचंद्र मुणगेकर म्हणाले, ''गेल्या चाळीस वर्षांत जे जे म्हणून दलित साहित्य निर्माण झाले ते सर्व आंबेडकरी प्रेरणेचे आणि आंबेडकरवादी साहित्य असे नामाभिधान होत असेल तर त्याचे मी शंभर टक्के समर्थन करतो.''

प्रा. केशव मेश्राम यांनी दलित साहित्य, बौद्ध साहित्य, फुले-आंबेडकर प्रेरणेचे साहित्य, परिवर्तन साहित्य, मार्क्स-आंबेडकरवादी साहित्य त्याचबरोबर जनवादी साहित्य, आदिवासी साहित्य, मुस्लिम साहित्य, ख्रिश्चन साहित्य आले आणि त्याला आपसूकपणे जात चिकटली गेली. असे सांगून आम्ही जेव्हा लिहायला सुरुवात केली तेव्हा तर दलित साहित्य हा शब्दही नव्हता तरीही आमचा उल्लेख दलित साहित्यिक म्हणून केला जातो अशी खंत व्यक्त केली. अशा प्रकारे आमच्या साहित्यामागे जात चिकटवून आम्हाला दलित साहित्यिक म्हणत असाल तर नाकावर टिच्चून लिहिले पाहिजे. कारण दलित ही जाणीव आहे. ती जात नाही हे ठासून सांगितले पाहिजे.

बुद्ध, फुले, आंबेडकर यांचे रसायन निर्माण झालेले साहित्य म्हणजे आंबेडकरवादी साहित्य असे मोहन वाघमारे या ग्रंथात म्हणतात, पण ही भूमिका विस्तृतपणे मांडायला हवी फुले-आंबेडकरवादी साहित्याचा गवगवा होतो, तेव्हा त्याबाबतचे आक्षेप मांडणेही गरजेचे आहे. अशी सूचना वामन होवाळ यांनी केली.

## हिंदू कोल्हाटी ही जात नाकारतो

आपल्या जन्माच्या वेळी सरकारी दप्तरी नोंदविलेली हिंदू-कोल्हाटी ही जात जाहीरपणे नाकारत असल्याचे 'कोल्हाट्यांचे पोर' या आत्मकथनाचे लेखक डॉ. किशोर शांताबाई काळे यांनी जाहीर केले.

वाशिम येथे भरलेल्या फुले-आंबेडकरी साहित्य संमेलनात पहिल्या सत्रात डॉ. काळे प्रकट मुलाखतीत बोलत होते. धर्माच्या संदर्भात आपण सर्वश्रेष्ठ असा माणूस धर्म मानतो. परिवर्तनासाठी पिढ्यानपिढ्या लागतात, मात्र आपल्या बाबतीत ते लवकर झाले. भोगलेल्या आयुष्याचे उघडं नागडं चित्र हे समाजाचे प्रतिक्रियात्मक स्वरूप असल्याचे त्यांनी सांगितले.

भोगलेल्या आयुष्याच्या जमाखर्चासाठी आत्मकथन हाच साहित्य प्रकार का निवडला? या आपल्याला लेखनाचा अनुभवच नव्हता पण शरणकुमार लिंबाळे यांनी लिहून काढण्याचा आग्रह केला. मी ते कागदावर उतरविले. मान्यवर प्रकाशन संस्थेकडे दिले पण त्यांची टाळाटाळ, पुस्तकाचे स्क्रिप्ट हरविल्याचा बहाणा, अखेर पोलिसात जाण्याच्या धमकीनं साहित्य परत मिळाले. ग्रंथाली प्रकाशनाने त्यांच पुस्तकात रूपांतर केले.

ग्रंथाली प्रकाशनाचा पुस्तक छापण्यामागचा हेतू सुरुवातीला जरी समजला नसला तरी पैसे कमविणे हा त्यांचा मुख्य हेतू होता हे आता कळल्याने आपण पुढची हिजडा एक मर्द!', 'बुद्ध बाटला' आदी पुस्तके स्वतःच प्रकाशित केल्याचे त्यांनी सांगितले.

अजय खडसे यांनी त्यांना कोल्हाट्याचं पोरं मध्ये खलनायक म्हणून बडेप्रस्थ नामदेवराव जगताप (बाप) यांचा उल्लेख का केला नाही? असे विचारल्यावर ते म्हणाले की, वास्तववादी चित्र मांडण्यासाठी म्हणून आणि माझ्या वाट्याला आईच नाव लावण्याची वेळ आली. केवळ पोर होण्यासाठी पुरुषाची गरज असते तेव्हढंच त्यांचं महत्त्व आहे. बाप म्हणून त्यांचे यापेक्षा जास्त कर्तृत्व नसल्याने त्यांचा उल्लेख टाळला. आज समाजात असे अनेक नामदेवराव आहेत.

नामदेवरावांच्या जीवनात येणाऱ्या अनेक स्त्रियांना जगण्यासाठी ते पैसे देत असत तर मग आपल्या आईस त्यांनी कसे सोडून दिले या प्रश्नावर त्यांना आईची अवस्था आजोबाला (आईचे वडील) सोडण्याची नव्हती म्हणून तिचे नाचणे पसंत केले. आज समाजात उघडीनागडी नाचणारी माधुरी, ममता ह्या कलाकार समजून सन्मानाचं जीवन जगतात पण आमच्या आया-बहिणी नऊवारी नेसून नाचतात तेव्हा हा समाज त्यांचा तमाशा ठरवितो.

आपल्या पुस्तकाबद्दल राज्य सरकारचा पुरस्कार का स्वीकारला नाही? युती शासनाने आणि सांस्कृतिक कार्य मंत्र्याने तमाशाच्या विकासासाठी शिबिरे भरविण्याची, प्रशिक्षण देण्याची योजना जाहीर केली पण प्रत्यक्षात त्यांच्या तमाशाच्या जीवनात त्यांच्या वाट्याला आलेले दुःख



समजून त्यांच्या विकासासाठी काही प्रयत्न न केल्याने आपण राज्य सरकारचा पुरस्कार नाकारला असे सांगितले. 'बुद्ध बाटला' या पुस्तकाच्या शीर्षकाच्या संदर्भात त्यांच्या विचाराचे गाठोडे घेऊन मिरविणारे त्यांच्या विचारांच्या विरुद्ध चळवळीत वागतो म्हणजेच बाटवितो असे समर्थन त्यांनी केले.

## सावरकरनिष्ठ वि. घ. देशपांडे यांचे चरित्र

प्रखर राष्ट्रभक्त, हिंदुत्ववादी, स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्यावर आत्यंतिक निष्ठा असलेले वि. घ. देशपांडे यांच्या कार्याची, प्रेरणादायी ओळख नव्या पिढीला होणे आवश्यक असल्याने भा. गं. देशपांडे यांनी लिहिलेले चरित्रलेखन नव्या पिढीसाठी मार्गदर्शक ठरेल, असे प्रतिपादन प्रा. राम शेवाळकर यांनी नागपूरला 'स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे खड्‌गहस्त' या पुस्तकाचे प्रकाशन करताना केले. प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ती श्रीमती सुमतीताई सुकळीकर, पुस्तकाचे प्रकाशक प्रसन्न मुजुमदार उपस्थित होते.

प्रा. शेवाळकर म्हणाले : सावरकरनिष्ठ अशी जी त्रयी विदर्भात प्रसिद्ध आहे ती म्हणजे वि. घ. देशपांडे, बाळशास्त्री हरदास आणि पु. भा. भावे! यात वि. घ. देशपांडे अग्रणी होते. वि. घ. देशपांडे म्हणजे तेजाचे स्फुल्लिंग होते. लाचारी, तडजोडीच्या आजच्या वातावरणात त्यांचा पीळदारपणा, बाणेदारवृत्ती, आपल्या ध्येयाप्रती समर्पणाची भावना आज दिसून येत नाही त्यामुळे त्यांच्या जीवनाच्या विविध पैलूंचे दर्शन घडविणारे चरित्र प्रेरणादायी आहे. भा. गं. देशपांडे यांनी त्यांचे बृहद् चरित्र लिहावे, त्यांच्या संपूर्ण विभूतीमत्त्वाचे दर्शन त्यातून घडवावे. अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. पुस्तकाचे लेखक भा. गं. देशपांडे, त्यांच्या पत्नी श्रीमती देशपांडे, पुस्तकाचे प्रकाशक प्रसन्न मुजुमदार यांचा सत्कार करण्यात आला. मीरा मालेगावकर यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. प्रा. वि. घ. देशपांडे यांचे पुत्र डॉ. कुमार देशपांडे, आनंद देशपांडे, अशोक देशपांडे यावेळी उपस्थित होते.

## वि. स. खांडेकर यांची जागा अन्य कोणी घेणार नाही– नरसिंह राव यांचे प्रतिपादन

'ययाती'कार वि. सं. खांडेकर हे मराठी साहित्याच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. ध्येयवादी खांडेकरांची जागा अन्य कोणी घेऊ शकत नाही, असे गौरवोद्गार माजी पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव यांनी वि. स. खांडेकर यांच्याबद्दल काढले.

साहित्य अकादमीतर्फे 'ययाती' कादंबरीच्या तेलगू अनुवादाचे राव यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. ज्ञानपीठ पुरस्कार विजेते डॉ. सी. नारायण रेड्डी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या समारंभात बोलताना माजी पंतप्रधान नरसिंह राव यांनी मूळ 'ययाती' (मराठी) कादंबरीचे पोत उलगडून दाखविले आणि लेखक म्हणून वि. स. खांडेकर यांची थोरवी सांगितली. आपल्या स्वतःवर खांडेकर यांचा मोठा प्रभाव पडला असल्याचा त्यांनी उल्लेख केला.

'ययाती' पौराणिक वातावरणातील कादंबरी असली तरी तिच्यातील संदेश अत्यंत आधुनिक

आणि धर्मनिरपेक्ष आहे, असे नरसिंहराव म्हणाले.

साहित्य अकादमीने ययातीचा तेलगू भाषेत अनुवाद प्रसिद्ध केल्याबद्दल श्री. राव यांनी अकादमीला धन्यवाद दिले. समृद्ध आणि उच्च दर्जाच्या भारतीय साहित्याला जागतिक साहित्यात जागा मिळवून देण्यासाठी अत्यंत समर्थ अनुवादक तयार करण्याची गरज त्यांनी प्रतिपादन केली.

डॉ. वाय. लक्ष्मीप्रसाद यांनी हा अनुवाद केला. या प्रकाशन समारंभास साहित्य अकादमीचे अध्यक्ष रमाकांत रथ, अनेक तेलगु खासदार व साहित्यप्रेमी उपस्थित होते.

## 'एक होता कार्व्हर' हे व्यक्तिमत्त्वाला आकार देणारे पुस्तक

'एक होता कार्व्हर'च्या माध्यमाने लेखिका वीणा गवाणकर यांनी समाजनिर्मितीच्या कार्यात मोठा हातभार लावला असून व्यक्तिमत्त्वाला आकार देण्याची क्षमता कार्व्हरच्या चरित्रात आहे, असे प्रतिपादन प्राचार्य राम शेवाळकर यांनी केले.

'एक होता कार्व्हर' या पुस्तकाच्या गेल्या वीस वर्षात सोळा आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या असून सतराव्या आवृत्तीचे प्रकाशन १४ फेब्रुवारी रोजी प्राचार्य शेवाळकर यांच्या हस्ते करण्यात आले. लेखिका वीणा गवाणकर यांचा स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. चारू माहुरकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्य शेवाळकर होते. विदर्भ साहित्य संघाचे प्रा. सुरेश द्वादशीवार प्रमुख पाहुणे होते.

शेवाळकर म्हणाले की, चरित्रलेखनातून संस्काराची इमारत तयार करण्यासाठी कार्व्हरचा मोठा आधार आहे. त्याच्या प्रयोगातून मिळणाऱ्या प्रेरणा विश्वात्मक आहेत. वीणा गवाणकर यांच्या चरित्राचे नायक विश्व नागरिक असून त्यांच्या जीवनप्रयोगांकडे लोकांचे फारसे लक्ष गेलेले नाही. कमालीची प्रतिकूल परिस्थिती असताना ही माणसांएवढा पराक्रम गाजवू शकतात तर मग अनुकूल परिस्थिती असताना आपल्याला आपले व्यक्तित्व का घडविता येऊ नये, असा विचार कार्व्हर वाचल्यानंतर मनात निर्माण होतो. हे संस्कार समाजनिर्मितीत अनमोल आहेत. 'एक होता कार्व्हर'च्या २० वर्षात १७ आवृत्त्या निघणे हे मराठी-वाचन संस्कृती प्रगल्भ झाल्याचे लक्षण आहे, अशी प्रशंसा सुरेश द्वादशीवार यांनी केली. कार्व्हर संशोधक आणि सामाजिक कार्यकर्ताच नाही तर एक संतही आहे. ती कार्व्हरचे जीवन अद्भुत आहे. अमेरिकेतील गुलाम आईचा हा मुलगा दोन महिन्यांचा असताना त्याच्या आईला पळवून नेतात. जर्मन आईवडिलांकडे तो वाढतो. स्वतःचे जीवन संघर्षमय असताना गरिबांना शक्तीशाली कसे बनविता येईल यासाठी आयुष्यभर झटतो. डॉ. चारू माहुरकर यांच्या हस्ते वीणा गवाणकर यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. वि. सा. संघाचे सरचिटणीस मनोहर म्हैसाळकर यांच्या हस्ते त्यांना स्मृतीचिन्ह प्रदान करण्यात आले.

'एक होता कार्व्हर' या पुस्तकाचे जनमानसात होत असलेले स्वागत हे खऱ्या अर्थाने कार्व्हर प्रवृत्तीचे स्वागत आहे, असे मनोगत लेखिका वीणा गवाणकर यांनी प्रगट मुलाखतीत व्यक्त केले. डॉ. वीणा मुळे यांनी मुलाखत घेतली. याप्रसंगी या पुस्तकाच्या लिखाणामागील



आपली भूमिका स्पष्ट करताना गवाणकर यांनी सांगितले की, २० वर्षांपूर्वी आपल्या मुलांना कार्व्हरची कथा सांगितली आणि त्यांच्याच सांगण्यावरून ती लिहूनही काढली. केवळ लहान मुलांना प्रेरणा मिळावी या उद्देशाने लिहिलेले पुस्तक मोठ्यांनीही उचलून धरले. कुठल्याही परिस्थितीत संघर्ष किंवा विद्रोह हेच उत्तर नाही, हे कार्व्हरने आपल्या जीवनात दाखवून दिले आहे. तो एक अतिशय कृतिशील शास्त्रज्ञ होता. ज्यांच्यासाठी संशोधन केले त्यांच्यावर त्याचे अपार प्रेम होते. चांगल्या प्रवृत्ती स्थलकालातीत असतात. कार्व्हर हीसुद्धा एक अशीच प्रवृत्ती आहे. कार्व्हर कसा घडला हे सांगण्याचा माफक प्रयत्न मी केला. वाचकांना तो इतका आवडला की त्यानंतरच्या आवृत्तीत त्यात कुठलाही बदल करण्याची माझी हिंमत झाला नाही, असेही स्पष्ट केले.

## 'दशावतारी'तून विविध प्रवृत्तींचे यथार्थ चित्रण : लीना मेहंदळे

समाजातील विविध प्रकारच्या प्रवृत्तींचे यथार्थ चित्रण 'गवसलेले आधुनिक दशावतारी' या पुस्तकात दिसते, असे मत राष्ट्रीय महिला आयोगाच्या सहसचिव लीना मेहंदळे यांनी पुणे येथे व्यक्त केले.

प्रवीण प्रकाशनाने, प्रसिद्ध केलेल्या वसंत पाटील लिखित या पुस्तकाचे प्रकाशन मेहंदळे यांच्या हस्ते झाले. 'साप्ताहिक सकाळ'चे संपादक सदा डुंबरे अध्यक्षस्थानी होते. डुंबरे म्हणाले, ''सर्वसामान्य नागरिक महसूल खात्याशी मोठ्या प्रमाणावर संबंधित असतात. त्यामुळे खात्यातील कर्मचाऱ्यांना वेगवेगळे अनुभव येतात. हे अनुभव नागरिकांना प्रेरणादायी ठरू शकतात. शासकीय कर्मचारी एखाद्या घटनेचा विचार कसा करतो, याचे प्रत्यंतर या पुस्तकात येते.''

## अक्षर मानव गृहनिर्माण प्रकल्प

'अक्षर मानव' ही साहित्य, कला, संस्कृती, शिक्षण, समाज या क्षेत्रात काम करणारी नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था असून या संस्थेकडून या क्षेत्रांमधले अनेक उपक्रम राबवले जातात.

पुण्यात स्वतःचं चांगलं घर असावं आणि ते स्वस्तात मिळावं असं बऱ्याच लोकांना वाटतं. पण निरनिराळ्या अडचणींमुळं तसं घर घेणं त्यांना जमत नाही. बरेच लोक कुठं भेट झाली की, पुण्यात आमच्यासाठी घर बघा, असंही सांगत असतात. एकेका व्यक्तीसाठी घर शोधत बसणं हा एक वेळखाऊ प्रकार होऊन बसतो. यावर उपाय म्हणून 'अक्षर मानव' या संस्थेकडून पुण्यात केवळ लेखक, पत्रकार, प्रकाशन व्यवसायातले लोक, कलावंत, प्रसिद्धी माध्यमातले लोक यांच्यासाठी स्वतंत्र गृहनिर्माण प्रकल्प उभा राहत आहे.

लेखक, कलावंत, प्रकाशन व प्रसिद्धी व्यवसायातले लोक एकत्र आणून, त्यांची गृहनिर्माण संस्था उभी करून महाराष्ट्र शासन व पुणे महानगरपालिकेकडं या प्रकल्पासाठी दोन एकर जागा विकत मागण्यात येणार आहे. प्रकल्पात केवळ एकशेवीस जणांनाच सभासद करून घेण्यात येणार आहे. त्यातल्या प्रत्येक सभासदाला एक हजार चौरस फुटांचं घर देण्यात येईल. प्रत्येकी बारा सदनिकांच्या दहा इमारतींचा हा प्रकल्प आहे. प्रत्येक इमारत तीन मजल्यांची असेल आणि प्रत्येक मजल्यावर चार सदनिका असतील. परिसरात भरपूर झाडं असतील. प्रकल्पात एक सभागृह, पोहण्याचा एक तलाव, एक व्यायामशाळा, छोट्या मुलांसाठी एक शाळा, एक वाचनालय, आणि सर्वांसाठी एक बागही असेल.

कुणा गृहबांधणी व्यावसायिकाकडं न जाता स्वत: 'अक्षर मानव' च्या देखरेखीखाली हा गृहप्रकल्प स्वयंसेवी संस्था म्हणून उभा राहील या गृहप्रकल्पात ही सदनिका फक्त चार ते साडेचार लाख रुपये या दरम्यान बसेल. सहकारी पद्धतीनं अनेक जास्तीचे खर्च टाळता येतील.

गृहप्रकल्पातील सभासदांना सदनिकेचे पैसे टप्प्याटप्प्यानं भरता येतील. प्रथमत: जागा विकत घेताना, नंतर बांधकाम सुरू करताना आणि त्यानंतर जागा ताब्यात घेताना अशा तीन टप्प्यात सदनिकेची रक्कम भरता येईल.

पुरेशी सभासदसंख्या झाल्यावर ठरवण्यात येईल. बैठक घेऊन पुढील कार्यवाही सभासद वर्गणी ११०० रुपये असून १२० जण सभासद झाल्यावर नोंदणी थांबवण्यात येईल. आपल्या सभासद वर्गणीचा धनादेश 'अध्यक्ष, अक्षर मानव' या नावानं काढावा. बाहेरगावच्या धनादेश वटणावळीसाठी २५ रुपये अधिक पाठवावेत.

पत्ता : अध्यक्ष, 'अक्षर मानव', ७३४ राममंदिर, अयोध्या इमारत, कुमठेकर मार्ग, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.

**(पुढील साहित्यवार्ता पान नं. ४२ वर)**


## काय वाचावे ?

**याचे वाचकांना मार्गदर्शन करणारे**
**अल्पावधीतच लोकप्रिय ठरलेले वाङ्मयीन मासिक**
**'मेहता मराठी ग्रंथजगत'.**
**आजच वर्गणीदार व्हा व**
**पुस्तक खरेदीवर २५% सवलत मिळवा.**
**१ वर्षाची वर्गणी - ८०रु.**
**३ वर्षाची वर्गणी - २००रु.**
**५ वर्षाची वर्गणी - ३००रु.**

**वर्गणी पाठवण्याचा पत्ता : मेहता मराठी ग्रंथजगत**
**द्वारा मेहता पब्लिशिंग हाऊस,१२१६, सदाशिव पेठ,**
**धनश्री अपार्टमेंट, पुणे - ४११०३०फोन : ४४७६९२४**




# पुरस्कार

## दादाजी वैशंपायन यांना योगतज्ज्ञ पुरस्कार प्रदान

आंतरराष्ट्रीय कीर्तीचे योगतज्ज्ञ दादाजी वैशंपायन यांना नुकताच मुंबईच्या शिखर प्रकाशन प्रतिष्ठानतर्फे योगतज्ज्ञ पुरस्कार गगनगिरी गडावर झालेल्या एका कार्यक्रमात गगनगिरी महाराज यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. एक लाख पंचाहत्तर हजार रुपये, मानपत्र आणि स्मृतिचिन्ह, असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. गेल्या ५० वर्षांत केलेल्या कार्याची पावती म्हणून त्यांना हा पुरस्कार देण्यात आला.

## महाबळ यांच्या पुस्तकाला चिं. वि. जोशी पारितोषिक

कॉन्टिनेंटल प्रकाशन पुरस्कृत चिं. वि. जोशी पारितोषिकासाठी श्री. भा. महाबळ यांच्या 'बाईमाणसाची अब्रू' या उत्कर्ष प्रकाशननिर्मित पुस्तकाची निवड करण्यात आली. परीक्षक म्हणून डॉ. अरविंद वामन कुलकर्णी व डॉ. द. दि. पुंडे यांनी काम पाहिले. महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे देण्यात येणाऱ्या या पारितोषिकाचे वितरण २६ फेब्रुवारीला मंगला गोडबोले यांच्या हस्ते झाले.

## 'जी. ए. कुलकर्णी कथा स्पर्धे'त महेंद्र फाटे यांना पारितोषिक

'साहित्य सहकार'च्या वतीने आयोजित केलेल्या जी. ए. कुलकर्णी कथालेखन स्पर्धेत महेंद्र फाटे यांच्या 'राक्षस' या कथेला द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. स्पर्धेची पातळी व निकष लक्षात घेता, गेल्या दहा वर्षांत प्रथम पारितोषिक कुणालाही मिळू शकलेले नाही.

या वर्षीचा निकाल पुढीलप्रमाणे प्रथम– कुणीही नाही, द्वितीय– महेंद्र फाटे (लोणावळा), तृतीय– सुचित्रा रानडे (सातारा) व उत्तेजनार्थ– अर्चना वर्टीकर (निगडी).

उज्ज्वल राठोड (पुणे) आणि नामदेव शिंदे (बारामती) यांना उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात आली. या दोन्ही स्पर्धांचे परीक्षक म्हणून ज्येष्ठ समीक्षक डॉ. अरविंद कुलकर्णी यांनी काम पाहिले. हीरकमहोत्सवी परंपरा असलेल्या फर्गसन महाविद्यालयातील 'साहित्य सहकार' या संस्थेच्या विविध स्पर्धांचे पारितोषिक वितरण गुरुवर्य रा. श्री. जोग स्मृतिदिनाच्या कार्यक्रमात केले गेले.

## दोन पुस्तकांना पुरस्कार

ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. आ. ह. साळुंखे यांच्या दोन पुस्तकांना पुरस्कार मिळाले आहेत. डॉ. साळुंखे यांच्या 'विद्रोही तुकाराम' या पुस्तकास डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॅशनल

असोसिएशन ऑफ इंजिनिअर्स या संस्थेच्या परभणी शाखेने 'अण्णाभाऊ साठे उत्कृष्ट साहित्य पुरस्कार' दिला. परभणी येथे झालेल्या कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. तर 'महाभारतातील स्त्रिया' या दुसऱ्या पुस्तकास शिवाजी विद्यापीठाच्या मराठी पुस्तक योजनेअंतर्गत पुरस्कार मिळाला आहे.

## डॉ. लीला दीक्षित यांच्या ग्रंथाला 'मुक्ताई' पुरस्कार

अमळनेरच्या चेतश्री प्रकाशनच्या वतीने देण्यात येणारा एक हजार रुपयांचा 'मुक्ताई पुरस्कार' सन २००० साठी पुण्याच्या डॉ. लीला दीक्षित यांच्या 'प्राचीन मराठी साहित्यातील स्त्रीरूप (महानुभाव ते रामदास)' या ग्रंथासाठी देण्यात आला आहे. हा ग्रंथ येथील गोकुळ मासिक प्रकाशन यांनी प्रकाशित केला आहे.

यापूर्वी हा पुरस्कार डॉ. बाबा आढाव, डॉ. भा. ज. कविमंडन, अविनाश धर्माधिकारी, प्रा गजमल माळी. डॉ. भा. ल. भोळे यांना देण्यात आला आहे.

## ना. धों महानोर, नगरकर यांना साहित्य अकादमी पुरस्कार प्रदान

ज्येष्ठ कवी ना. धों महानोर आणि इंग्रजी व मराठी कादंबरीकार किरण नगरकर यांच्यासह सोळा जणांना साहित्य अकादमीचे अध्यक्ष रमाकांत रथ यांच्या हस्ते सन २००० साठीचे साहित्य अकादमी पुरस्कार प्रदान करण्यात आले.

दिल्लीच्या कामानी सभागृहात झालेल्या या शानदार कार्यक्रमात इंग्रजी भाषेतील कवी केकी एन. दारूवाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. लेखकाची ओळख (आयडेंटिटी), साहित्य, भाषा, इतिहास यांवर आपले विचार व्यक्त करताना त्यांनी संत तुकारामांचा 'शब्द हीच माझी रत्ने, शब्द हीच माझी वस्त्रे आणि शब्द हेच माझे अन्न आणि संपत्ती' या अर्थाच्या अभंगाचा उल्लेख केला. त्याचबरोबर पश्चिमेकडील साहित्याबाबत भावातिरेक करणे योग्य नसल्याचे मत व्यक्त केले.

साहित्य अकादमीचे अध्यक्ष रमाकांत रथ म्हणाले, ''माणसामाणसांत फूट पाडणाऱ्या, दहशत निर्माण करणाऱ्या, मृत्यू आणि अपमानाच्या संस्कृतीचा दबदबा राहिला तर साहित्य निर्मिती आणि वाचनाची संस्कृती एकत्रितरीत्या नांदू शकत नाहीत.''

साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्यांपैकी शांतिनाथ देसाई (कन्नड भाषा) व बंधू शर्मा (डोंगरी भाषा) यांना हा किताब मरणोत्तर देण्यात आला.

## ना. धों. महानोरांचा दिल्लीत सत्कार

''मराठी कवितेच्या श्रेष्ठ परंपरेतील शेती आणि खेड्याची एक वाट घेऊन मी चाललो आहे. मृगाच्या वेळी मी पीक काढतो. त्याचे कवितेइतकेच माझ्या जीवनात महत्त्व आहे,'' अशी भावना ज्येष्ठ कवी व साहित्य अकादमी पुरस्कार विजेते ना. धों. महानोर यांनी नवी दिल्ली येथे व्यक्त केली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या निवासस्थानी श्री. महानोर यांचा सत्कार झाला, या वेळी श्री. महानोर यांच्या कविता व चित्रपटगीतांवर आधारित



रवींद्र साठे व अनुराधा मराठे यांच्या सुश्राव्य गायनाचा कार्यक्रम झाला. पवार यांच्यातर्फे मानवी साधनसंपत्ती विकास खात्याच्या राज्यमंत्री सुमित्रा महाजन यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार केला.

यशवंतराव चव्हाण यांच्या दिल्लीतील वास्तव्याच्या आठवणींना उजाळा देत श्री. महानोर म्हणाले, ''माझ्या कविता ऐकायला यशवंतराव माझ्या गावी आले होते, तसेच येथील रेसकोर्सवरील त्यांच्या निवासस्थानी मी अनेकदा गेलो होतो. त्यांच्या घरी साहित्य, कला यांची कदर होत असे. साहित्याचा पोत जपणारी यासारखी चांगली गोष्ट नसेल, असे आजच्या प्रसंगी वाटत आहे.'' ''लोकांनी माझ्या शब्दांभोवती घर केले. कोणताही भेदभाव न मानता रसिकांनी आम्हाला मोठे केले.'' दगडधोंड्यात गुण असला, तरी मराठी माणूस त्याला उचलून धरतो. त्याचे मन मोठे आहे.''

आमच्या कुरूप शब्दांना सुरूप कसे करायचे, हे लता मंगेशकर, रवींद्र साठे यांना ठाऊक आहे, असे सांगून महानोर म्हणाले, ''समाजात जे चांगले आहे, ते मांडण्याचा मी सतत प्रयत्न करणार आहे. तसेच जे काही लिहीन ते चांगले पोत असलेले असेल.''

'आम्ही ठाकर ठाकर', 'पीक करपलं,' 'लाल पैठणी, रंग माझ्या चोळीला,' तसेच जैत रे जैत, विदूषक या चित्रपटांतील लोकप्रिय गाणी, बोर्डाची लावणी, बैठकीची लावणी उपस्थितांनी यांचा आनंद लुटला. या वेळी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू, राम नाईक, जयसिंहराव गायकवाड पाटील; प्रकाश जावडेकर, भाजप, शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार आणि राजधानीतील प्रतिष्ठित उपस्थित होते.

## कमलाकर धारप यांचा पद्मगंधा प्रतिष्ठानतर्फे गौरव

साहित्यिक व सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत पद्मगंधा प्रतिष्ठानतर्फे नागपूर लोकमतचे कार्यकारी संपादक कमलाकर धारप यांचा जीवनगौरव पुरस्काराबद्दल सत्कार करण्यात आला.

प्रतिष्ठानने सुप्रसिद्ध लेखिका डॉ. प्रतिमा इंगोले तसेच श्यामकांत कुळकर्णी, सुनंदा पाटील, प्रेमा घुले या मान्यवरांना गौरविले होते. प्रतिष्ठानच्या अध्यक्ष व शुभांगी भडभडे यांच्या हस्ते धारप यांना शाल, पुष्पगुच्छ व मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या छोटेखानी समारंभाच्या अध्यक्षस्थानी सुधाकर गायधनी होते.

अरविंदबाबू देशमुख प्रतिष्ठानतर्फे कमलाकर धारप यांना पत्रकारितेतील प्रदीर्घ व मोलाच्या योगदानाबद्दल पहिल्या जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले असल्याचे छाया कावळे यांनी प्रस्ताविकात सांगितले.

स्तंभलेखक जालंदर पुरोहित, कथालेखक श्यामकांत कुळकर्णी, लेखिका प्रतिभा कुळकर्णी, शुभांगी गानू, तसेच प्रतिष्ठानच्या अध्यक्षा शुभांगी भडभडे यांनी कमलाकर धारप यांच्या पत्रकारिता व साहित्य क्षेत्रातील महत्त्वपूर्ण योगदानाचा उल्लेख केला. कमलाकर धारप यांनी सत्काराला उत्तर देताना भाऊसाहेब माडखोलकर, पां. वा. गाडगीळ, बाबा दळवी यांच्या संस्कारामधून आणि जवाहरलाल दर्डा यांनी दिलेल्या लेखनस्वातंत्र्यामुळे आपल्यातील पत्रकार घडला, अशी कृतज्ञता व्यक्त केली.

## सदानंद देशमुख यांना शिवार प्रतिष्ठानचा शेतकरी साहित्य पुरस्कार

औरंगाबाद येथील शिवार प्रतिष्ठानचा शेतकरी साहित्य पुरस्कार यावर्षी वैदर्भीय कादंबरीकार सदानंद देशमुख यांना जाहीर झाला आहे. महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष आणि शिवार प्रतिष्ठानचे संयोजक श्री. रा. रं. बोराडे यांनी ह्या पुरस्काराची घोषणा केली. शेतकऱ्यांच्या संवेदना आणि वर्तमान ग्रामीण समाज जीवनाचे प्रत्ययकारी चित्रण संदानंद देशमुख यांच्या लेखनातून घडते म्हणून पुरस्कारासाठी त्यांची निवड केली असल्याचे मत निवड समितीने म्हटले आहे.

मेहता प्रकाशनाने त्यांचे लचांड, उठावण, महालूट हे ग्रामीण कथासंग्रह प्रकाशित केले असून त्यांना महाराष्ट्र शासनाचा राज्य पुरस्कार, महाराष्ट्र साहित्य परिषदेचा ग. ल. ठोकळ पुरस्कार, फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्सचा उत्तम पुस्तक निर्मितीचा पुरस्कार, हेमांगीचा वि. स. खांडेकर कथापुरस्कार प्राप्त झाला आहे.

कॉन्टिनेन्टल प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या त्यांच्या 'तहान' या कादंबरीला मॅजेस्टिक प्रकाशनचा जयवंत दळवी स्मृती कादंबरी पुरस्कार, विदर्भ साहित्य संघाचा पु. य. देशपांडे स्मृती कादंबरी पुरस्कार, शोभणे प्रतिष्ठानचा केशवराव शोभणे स्मृती कादंबरी पुरस्कार प्राप्त झाले असून आकाशवाणी जळगाव केंद्राने 'तहान' कादंबरीचे क्रमश: प्रसारण केले आहे.

# नवीन स्पर्धा

***'आम्ही वायंगणकर म्हणजे मूळचे सावकार वायंगणकर. उत्तर पेशवाईत दुसरा बाजीराव पैशाच्या कायम अडचणीत असायचा. एकदा तो अडचणीत आला आणि आमच्या पूर्वजांकडे त्याने सोमवारातला वाडा गहाण टाकला. पैशाची परतफेड झाली नाही, म्हणून शेवटी तो वाडा वायंगणकरांचा वाडा झाला.'***

---

***'तीन गोष्टी खायच्या वर्ज्य कर, मटण, साखर आणि भात. बघ- पूर्वीसारखी बारीक होशील'***

***त्यावर खट्याळपणे मीनाताई म्हणाल्या–***

***'म्हणजे त्या परत हिरॉईनची कामं करायला लागतील का ?***

वर दोन गाजलेल्या पुस्तकांमधील मजकूर दिलेला आहे. या मजकूरावरून पुस्तकाचे नाव ओळखून आपण आम्हांस कळवायचे आहे. पुस्तकाची नावे ओळखा व बक्षीस मिळवा. बरोबर उत्तर पाठवणाऱ्यांपैकी लॉट टाकून येणाऱ्या पहिल्या तीन स्पर्धकांना आपल्या पसंतीचे प्रत्येकी १०० रुपयांचे पुस्तक बक्षीस.

**मुदत : १६ एप्रिल २००१**

आमचा पत्ता : **मेहता मराठी ग्रंथजगत,** १२१६ सदाशिव पेठ, पुणे-३०



# श्रद्धांजली

## चंद्रकांत मांडरे यांचे निधन

मराठी चित्रपटरसिकांच्या हृदयसिंहासनावर अर्धशतकाहून अधिक काळ अधिराज्य गाजविणारे श्रेष्ठ अभिनेते आणि चित्रकार चंद्रकांत मांडरे (वय ८८) यांचे दि. १७ फेब्रुवारी रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले.

कोल्हापुरात १३ ऑगस्ट १९१३ रोजी जन्मलेल्या गोपाळ उर्फ चंद्रकांत तुकाराम मांढरे यांनी पोस्टर पेंटर म्हणून चित्रपटसृष्टीत प्रवेश केला. बाबूराव पेंटर यांनी १९३५ मध्ये निर्माण केलेला 'सावकारी पाश' हा त्यांचा स्वतंत्र भूमिका असलेला पहिला चित्रपट. वयाच्या ऱ्याऐंशीव्या वर्षी त्यांनी या चित्रपटातील कारभाऱ्याची भूमिका साकारली.

चित्रपटांच्या मायावी दुनियेत राहूनही चंद्रकांत निर्व्यसनी राहिले. चित्रपटसृष्टीत कमावले, ते चित्रकलेसाठी खर्च केले. त्यांनी आपला राहता बंगला आणि सर्व पेंटिंग्ज १९८४ मध्ये महाराष्ट्र शासनाकडे सुपूर्द केली. १९८७ मध्ये त्याचे 'चंद्रकांत मांडरे कलासंग्रहालय' असे नामकरण करण्यात आले. राज्य व राष्ट्रीय पातळीवरील अनेक पुरस्कार त्यांना मिळाले. त्या पुरस्कारांच्या रकमेतून 'चंद्रकांत मांडरे ट्रस्ट'ची स्थापना करण्यात आली. या ट्रस्टमार्फत दर वर्षी एका चित्रपट-नाट्य कलावंताला आणि एका चित्र-शिल्पकाराला प्रत्येकी अकरा हजार रुपयांचा पुरस्कार दिला जातो. समाजाने जे दिले, ते समाजालाच परत देण्याच्या भूमिकेतून त्यांनी आपल्या पुरस्कारांची रक्कम स्वत:साठी खर्च केली नाही.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या अजरामर भूमिकेबरोबरच छत्रपती संभाजी आणि शहाजीराजे यांच्या भूमिकाही चंद्रकांत यांनी साकारल्या. 'रामराज्य' आणि 'भरतभेट' या चित्रपटांतील त्यांच्या प्रभू रामचंद्रांच्या भूमिकेने काही काळ त्यांना देवत्वाचा मान मिळाला. सामाजिक व कौटुंबिक चित्रपटांतून त्यांनी केलेल्या पाटलाच्या भूमिकेनेही ठसा उमटविला. त्याचप्रमाणे दरोडेखोराच्या भूमिकेतही ते लक्षात राहिले. 'शेजारी,' 'थोरातांची कमळा', 'जय मल्हार', 'मीठभाकर', 'मानाचं पान', 'छत्रपती शिवाजी', 'मुक्काम पोस्ट ढेबेवाडी', 'भाऊबीज', 'सांगत्ये ऐका', 'मोहित्यांची मंजुळा', 'मानाचा मुजरा', 'ईर्षा', 'अष्टविनायक', 'नवरंग', 'राजा गोपीचंद', 'महारथी कर्ण', 'जीवन यात्रा', 'मेरे लाल' हे त्यांचे काही गाजलेले चित्रपट होत.

'लाइन्स ऑफ दि रॉक' या इंग्रजी चित्रपटांत त्यांनी शहाजीराजांची भूमिका केली; शिवाय शंभराहून अधिक मराठी व हिंदी चित्रपटांतून भूमिका केल्या. 'युगे युगे मी वाट पाहिली', 'पवनाकाठचा धोंडी', 'संथ वाहते कृष्णामाई' या चित्रपटांसाठी राष्ट्रीय तर 'संथ वाहते...' आणि 'खंडोबाची आण' या चित्रपटांसाठी राज्य पुरस्कार मिळाले.

शिवाजी विद्यापीठाने 'डी. लिट.' ही सन्माननीय पदवी देऊन त्यांचा गौरव केला. त्याशिवाय शाहू पुरस्कार, व्ही. शांताराम पुरस्कार, फाय फाउंडेशन पुरस्कार, अखिल भारतीय चित्रपट महामंडळाचा चित्रभूषण पुरस्कार, पुण्याच्या टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचा पुरस्कार, भालजी पेंढारकर सांस्कृतिक केंद्राचा पुरस्कार, टिळक स्मारक ट्रस्टचा बॅरिस्टर ओक पुरस्कार, पुण्याचा राजमाता जिजाऊसाहेब पुरस्कार आणि कोल्हापूर महापालिकेचा कोल्हापूर भूषण पुरस्कार अशा विविध पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले.

## पुस्तक परिचय

# ज्युरॅसिक पार्क

अनु. : डॉ. प्रमोद जोगळेकर

### डायनोसॉरच्या विलक्षण विश्वातला रोमांचकारक फेरफटका

बहुतेक सर्वांनीच ज्युरॅसिक पार्क हा चित्रपट पाहिलेला असणार. परंतु तो ज्या कांदबरीवर आधारलेला आहे ती फार कमी मराठी वाचकांनी वाचली असेल. त्या कादंबरीचा मराठी अनुवाद आता मेहतांनी काढला आहे, त्यामुळे मराठी वाचकांची मोठीच सोय झाली आहे.

ज्युरॅसिक पार्क या चित्रपटामुळे डायनोसॉर ह्या प्राण्याचे नाव लहानथोरांच्या तोंडी झाले. त्या प्राण्याच्या प्रतिमा सर्वत्र दिसू लागल्या. कोट्यवधी वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या आणि पृथ्वीवरून नामशेष झालेल्या महाकाय प्राण्याचे अवशेष शोधून, त्याच्या जीवाश्मातील रेणूंपासून त्याची जैव अभियांत्रिकीने पुन:निर्मिती करण्याची कल्पना एका शास्त्रज्ञाच्या मनात येते आणि मुलांसाठी एका म्युझियममध्ये त्याची प्रतिकृती ठेवावी एवढ्या माफक अपेक्षेने सुरू झालेल्या या प्रकल्पातून पर्यटकांसाठी एक रमणीय रिसॉर्ट काढण्यापर्यंत त्याची मजल जाते...

मायकेल क्रायटन या कादंबरीकाराने या कल्पनेवर असा काही विलक्षण कथात्मक डोलारा उभा केला आणि आजच्या संगणकाधिष्ठित ग्राफिक्सच्या आधारे या डायनोसॉरची संपूर्ण वसाहतच चित्रपटाच्या पडद्यावर दाखवून या कल्पनेचे भव्यतम स्वरूपात नाट्यपूर्ण सादरीकरण केले गेले. त्या चित्रपटाच्या निर्मितीसाठी अब्जावधी डॉलर्स खर्च केला गेला आणि त्या खर्चाच्या कितीतरी पट उत्पन्न त्याने पहिल्या वर्षातच मिळवले.

मायकेल क्रायटनने डायनोसॉरच्या निर्मितीची प्रक्रिया शास्त्रीय परिभाषेत शास्त्रज्ञांच्या माध्यमातून सांगण्यात तर कमालीचा काटेकोरपणा दाखवलाच आहे; डायनोसॉर जर आपल्या नियंत्रणाबाहेर गेले तर होणारा अनर्थ व संहार याचा धोकाही तितक्याच परिणामकारकरीत्या प्रकट केला आहे.

या कथेला नाट्यपूर्ण बनविण्यासाठी मायकेल क्रायटनने जी कल्पकता वापरली आहे ती त्याच्या प्रतिभेची साक्ष पटवणारी आहे.

प्रयोगशाळेत जीवाश्मातील रेणूच्या आधारे डायनोसॉरची निर्मिती होऊ शकते. ही घटना तशी जगभर नोंद घेतली जावी अशी आहेच. पहिले कृत्रिम हृदयारोपण, मेंढीची क्लोनिंग तंत्राद्वारे निर्मिती, टेस्ट ट्युब बेबी या घटना विसाव्या शतकात महत्त्वपूर्ण मानल्या गेल्या



आहेतच. परंतु या शक्यतेचा वापर करून एका रोमांचकारक कथानकाची त्याला जोड देणे हे अवघड काम आहे. ते मायकेल क्रायटनने करून, चित्रपटाद्वारे संपूर्ण जगभर डायनोसॉरांना लोकमानसात स्थानापन्न केले. प्रत्यक्षात डायनोसॉर आज अस्तित्वात नाहीत; परंतु ज्युरॅसिक पार्क या चित्रपटामुळे लहानथोरांच्या लेखी डायनोसॉर हा अत्यंत परिचयाचा प्राणी ठरला आहे.

मूळ कादंबरीतील घटनाक्रम आणि चित्रपटातील कथावस्तू यांच्या मांडणीत व सादरीकरणात बराच फरक आहे. पावणेचारशे पृष्ठांच्या कादंबरीतील विविध घटना दीड-दोन तासाच्या चित्रपटात बसवण्यासाठी बरीच योजकता दाखवणे क्रमप्राप्त होतेच. चित्रपटाची सुरुवात ज्युरॅसिक पार्कच्या दिशेने निघालेल्या विमानातील प्रवाशांमधील संभाषणाने होते. गणितज्ञ डॉ. इयान माल्कम, हा या बेटावरील हॅमान्डच्या या प्रकल्पाला यश मिळणार नाही असे ठामपणे सांगत असतो. इनजेन कंपनीला सल्ला देण्यासाठी तयार केलेले टिपण तो दाखवतो. जेन्नारोने माल्कमला आमंत्रित केलेय म्हणून हेमान्ड मनातून नाखुष असतो. डॉ. माल्कम डोनाल्ड जेन्नारोला आपला केऑस सिद्धांत समजावून सांगू पाहतो, पण तो म्हणतो, ''हे सारं माझ्या डोक्यावरून जातंय.'' पुढं डॉ. माल्कम सांगतो, ''हॅमान्ड फाउंडेशनच्या प्रकल्पाबद्दल बोलायचं तर त्याचा हा प्रकल्प वरवर साधा आहे. पण प्राणिसंग्रहालयात ठेवलेले प्राणी अत्यंत बेभरवशाचं वर्तन करू शकतात... आपल्या केऑस सिद्धांतानुसार बेटावरील प्रणाली लवकरच अनपेक्षित वर्तन दाखवायला सुरुवात करणार आहे... मला शंभर टक्के खात्री आहे. बेटावर काहीतरी गडबड आहे. तिथं कोणता तरी अपघात घडण्याची दाट शक्यता आहे.'' ही अपघाताची शक्यता डॉ. माल्कम बोलून दाखवतो,

सान जोझला विमान येते. तेथून हेलिकॉप्टरने सर्वजण कोस्टारिकाच्या अरण्यातील बेटाकडे निघतात. डायनोसॉरचे चित्तथरारक दर्शन घडते. डॉ. माल्कम त्यांच्याबरोबरच्या अन्य प्रवाशात पुरावनस्पतीशास्त्रज्ञ डॉ. एली साटलर, (वय २४) ही एक असते. डेनव्हर विद्यापीठातील पुराजीवशास्त्रज्ञ ॲलन ग्रँट हाही असतो. (त्यालाच १९७९ मध्ये प्रथम मोन्टानामध्ये डायनोसॉरची अंडी सापडली होती. त्यावरचा पेपर त्याने १९८३ मध्ये प्रसिद्ध केला होता. त्यानंतर जेन्नारोने त्याच्याशी संपर्क साधून, त्याजकडून महिती मिळवली होती. परंतु पुढे ग्रँटचा व जेन्नारोचा संपर्क राहिला नव्हता.)

या दोघांना कोस्टा रिकावरच्या बेटावरील इसला नूबलार रिसॉर्टच्या सहलीचे आमंत्रण जॉन हॅमान्डनेच दिलेले असते. जेन्नारो हा इनजेन कंपनीचा कायदेशीर सल्लागार असतो. रिसॉर्टचे माहितीपत्रकही त्यांना पाठवण्यात आलेले असते. हॅमान्डने १९८३ ते १९८५ या दोन वर्षात गुंतवणूकदारांना आकृष्ट करून बाजारातून ८७ कोटी डॉलर्स उभे केले. पाच वर्षे या गुंतवणूकीवर नफा मिळणार नाही; परंतु दहा वर्षांनी सात अब्ज डॉलर्सचा फायदा होईल असे तो ठामपणे सांगत असे.

...जगातलं एक अत्त्युत्तम रिसॉर्ट, इलेक्ट्रॉनिक आणि सजीव आकर्षणांनी परिपूर्ण, खरीखुरी मनोरंजनाची साधने, संगणकाचा वापर करून कमीत कमी माणसात या रिसॉर्टमधील कामे सुरळीत चालू राहतील अशी व्यवस्था. या बेटाबद्दल बरीच गुप्तता पाळण्यात आलेली असते.

ते लोकांसाठी खुले झाल्यावर सर्वजण चकित होतील, याबद्दल हॅमॉन्डच्या मनात शंका नसते. जपानी गुंतवणूकदार त्यात जास्त होते.

लेविस डॉजसन हा कुप्रसिद्ध व आक्रमक अनुवंशशास्त्रज्ञ. अवघा ३४ वर्षे वयाचा; परंतु बायोसिन या कंपनीच्या नवीन उत्पादनांच्या संशोधन विभागाचा प्रमुख. प्रतिस्पर्ध्यानं बनविलेलं उत्पादन घेऊन त्याची चिरफाड करून, त्यात बदल करून तेच उत्पादन बाजारात आणण्याची 'विरुद्ध दिशेची अभियांत्रिकी पद्धत' ही त्याची खासियत. या औद्योगिक हेरगिरीसाठी कुठलाही मार्ग त्याला निषिद्ध वाटत नसे. इनजेन कॉर्पोरेशनने इसला नूबलार बेट विकत घेऊन त्यावर तीन महासंगणक बसवले आहेत आणि पिवळी राळ गोळा करण्याचे काम चालवले आहे. पुराजीवशास्त्रज्ञ, डीएनए तज्ज्ञ, पक्ष्यांच्या अंड्यांच्या वरच्या कवचासारखे दिसणारे प्लॅस्टिक बनवून त्याचे पेटंट या कंपनीचे घेतले आहे, त्या अंड्यात कृत्रिमरीत्या कोंबडीचा गर्भ वाढवण्याची शक्यता असून अवाढव्य बांधकाम, दोन मैल लांबीचे तळे, उत्तम रिसॉर्ट, प्रचंड खासगी प्राणिसंग्रहालय, फार पूर्वी नष्ट झालेल्या प्राण्यांचं क्लोनिंग करून ते प्राणी तेथे ठेवण्याची योजना, डायनोसॉरचे विविध प्रकार निर्माण करण्यासाठी लागणारे उत्खननातून मिळणाऱ्या हाडांतून व जीवाश्मातून डीएनएचे रेणू शोधून काढण्याचे या संस्थेने चालवलेले प्रयत्न या सर्वांची माहिती डॉजसन आपल्या बायोसिन कंपनीच्या संचालकांना देतो आणि डायनोसॉरचे इनजेन कंपनीला मिळाले असतील ते डीएनए रेणू मिळवून बायोसिन कंपनी मालामाल होऊ शकेल असे चित्रही तो संचालकांपुढे उभे करतो.

इनजेन कंपनीवर नाराज असणारा शास्त्रज्ञ गाठून किंवा कंपनीने टाकून दिलेल्या कचऱ्यातून असे डीएनए रेणू मिळवणे शक्य आहे. हे सांगितल्यावर त्याला सर्व संचालक त्याबाबत पुढची पावले उचलण्यास मान्यता देतात.

डॉजसन इनजेनमधील एका असंतुष्ट कर्मचाऱ्याला पटवतो. पंधरा लाख डॉलर्सचे आमिष दाखवून, त्याला जिलेटच्या दाढीच्या साबणाचा एक मोठा कॅन देतो. वरचा भाग दाबल्यावर शेव्हिंग क्रीम बाहेर पडते; पण खालचा भाग पोकळ असतो. त्यात डीएनएचे रेणू वा पंधरा जातींचे गोठलेले भ्रूण राहू शकतील– कोणाला संशयही येणार नाही, अशी योजना असते. छत्तीस तास भ्रूण राहू शकतील एवढा गोठवणारा वायू त्या कॅनच्या पोकळ भागात असतो. तो कॅन सान जोझला पोचवला की झाले.

दहा-अकरा वर्षाचा टिम मर्फी आणि सात-आठ वर्षांची सोनेरी केसांची त्याची बहीण ॲलेक्स– या दोघांचेही त्या बेटावर त्याच वेळी आगमन होते. हॅमान्ड त्यांचे आजोबा असतात. या दोघांच्या आईवडिलांचा घटस्फोट होऊ घातला होता. म्हणून त्यांना हॅमान्ड आजोबांनी आपल्या या बेटावर आमंत्रित केलेले असते.

टिमला डायनोसॉरमध्ये रस असतो. त्याबद्दलचे ग्रॅन्टचे पुस्तक त्याने वाचलेले असते. प्रत्यक्ष ग्रॅन्टच भेटल्यावर त्याच्या उत्साहाला उधाण येते. म्युझियममधील डायनोसॉरच्या शेपटीत ३७ मणक्यांपेक्षा अधिक मणके बघून तेथील अधिकाऱ्याला हा सांगाडा चुकीचा आहे असे त्याने म्हटले होते. टिमने ही हकीकत सांगितल्यावर डॉ. ग्रॅंट विचारतो, त्या सांगाड्याचा नंबर



५०२७ होता का? त्यामुळे चकित झालेला टॉम त्याला चिकटतोच!

...या बेटावर २३८ डायनोसॉर असतात; परंतु प्रत्यक्ष संगणकीय मोजदाद करताना त्यांची संख्या जास्त जास्त होत जाते. यावरून त्यांच्यात प्रजनन प्रक्रिया सुरू आहे हे लक्षात येते आणि सर्वजणच चक्रावतात... त्या बेटावर सर्व प्रकारची दक्षता घेतलेली असते. किरणोत्सारी द्रव्यविभाग, वगैरे भागात प्रवेशाबाबत बंधने असतात. संगणक विभागात डीएनए रेणूचे विकरांनी कापलेले तुकडे कसे जुळू शकतात याचे प्रात्यक्षिकच पडद्यावर बघायला मिळते. ''डीएनए वापरून कोणता प्राणी तयार होतो ते बघायचं'' हा मार्ग तेथे चोखाळला जातोय अशी माहिती तिशीतला हेन्री वू हा शास्त्रज्ञ देतो. उबवणी कक्षातून बारा बॅचमध्ये एकूण २३८ जिवंत प्राणी निर्माण झाल्याची माहितीही वू डॉ. ग्रॅंटला देतो. निर्माण केलेल्या प्राण्यांपैकी अर्धा टक्का प्राणी जेमतेम जिवंत राहतात. डायनोसॉरच्या ३४७ प्रजाती असल्याचे टिम म्हणतो. त्यातील व्हेलोचिराप्टर वगैरे प्रजाती मांसभक्षकही असतात. हे रॅप्टर उड्या मारू शकतात.. ज्युरॅसिकपार्कमधील सर्व प्राणी माद्या असतात; त्यांच्यावर क्ष किरणांचा मारा करून त्यांची जननशक्ती नष्ट करण्यात येते. ज्युरॅसिक पार्कमध्ये शक्य तितकं नैसर्गिक पर्यावरण निर्माण केलेलं आहे. त्याच्या सफाईसाठी, मेलेल्या प्राण्यांना साफ करण्यासाठी प्रोकॉम्पसोग्नाथस म्हणजे कॉंपीज्ची निर्मिती करण्यात आली आहे. काही तृणभक्षक डायनोसॉर तीस टनापेक्षा जास्त वजनाचे आहेत. त्यांच्या मलमूत्राची विल्हेवाट हे साठ-पासष्ट कॉम्पीज लावत असतात... या सर्व प्राण्यांवर संगणकाचे नियंत्रण असते... हे प्राणी आमचे कैदी आहेत. त्यांना लायसिन ॲमिनो आम्ल हे बाहेरून अन्नातून मिळावे लागते. ते जर मिळाले नाही तर बारा तासात ते प्राणी कोमात जातील अशी व्यवस्था आहे.

...असे अनेक तपशील डॉ. ग्रॅंट आणि डॉ. साटलर यांना ज्युरॅसिक पार्कच्या फेरफटक्यात कळत जातात.

कादंबरीच्या कथानकाला रंग भरतो. जर संगणकीय प्रणालीत बिघाड होऊन हे प्राणी नियंत्रणाच्या बाहेर गेले तर–? तसा धोका उद्भवला तर?

–तर काय अनर्थ होऊ शकतो?

चित्रपटात ते उत्तम प्रकारे दाखवले आहे. क्षणाक्षणाला श्वास रोखून धरून प्रेक्षक ते नाट्य बघतात.

कादंबरीत ते नाट्य शब्दाशब्दांतून व्यक्त होते. आपल्या कल्पनाशक्तीला भन्नाट खाद्य पुरवते. चित्रपटात काही गोष्टी जास्त लक्षवेधक वाटतात. काही तपशील ओझरते येतात. कादंबरीच्या मूळ संहितेत ते विस्ताराने येतात. त्यातील तर्कसंगती अधिक तावूनसुलाखून पेश होते.

चित्रपटातले अनेक प्रसंग स्मृतिपटलावरून धूसर होत जातात. मूळ कादंबरी वाचल्याने त्या सर्व घटनाक्रमाची अधिक तर्कसंगत अशी मालिका समोर येते. म्हणून ही कादंबरी वाचायलाच हवी.

**पृष्ठे** ३७३ **किंमत** :२५०रु. **सवलतीत** :२१३रु. **सभासदांना** :१८८रु. **पोस्टेज** :१५रु.

# सुखशांतीच्या शोधात

## अंजली ठकार

**बालपण, तारूण्य, वार्धक्य-
सारं काही मस्त भोगण्यात
आनंद असतो.**

अंजली ठकार यांचे 'सुखशांतीचा शोध' हे ५२ स्फुट लेखांचे संकलन म्हणजे ललितरम्य भाषेत घेतलेला जीवन श्रेयाचा आणि अंतरंगाचा शोध होय.

अंजली ठकार आज पंचाहत्तरीच्या घरात आहेत. त्यांनी ज्ञानेश्वरीचे समरूप ओवीमध्ये रूपांतर करून ते प्रसिद्ध केले आहे. अध्यात्मचिंतनाकडे त्यांचा ओढा आहे. त्यांचे श्वशुर शंकरराव विनायक ठकार हे गांधीवादी कार्यकर्ते होते. पश्चिम खानदेशात भिल्ल आदिवासींच्या सेवेत त्यांनी आयुष्य घालवले. महिना ७५ रुपये मानधन त्यांना कार्यकर्ता म्हणून मिळे. त्यांचा नऊ महिन्याचा मुलगा अचानक वारला; तेव्हा त्या ७५ रुपयांतही त्यांनी २५ रुपये कपात करायला सांगितले. अशा अपरिग्रही घरच्या संस्कारात वाढलेल्या अंजलीबाईंना ज्ञानेश्वरीतील तत्त्वचिंतनाची आणि अध्यात्माची ओढ असावी यात नवल नाही.

हे पुस्तक वाचताना आणखी एक तपशील लक्षात घ्यायला हरकत नाही.

१९९० साली अंजलीबाईंना ब्रेन ट्युमरच्या शस्त्रक्रियेच्या दिव्यातून जावे लागले. त्या वेळी त्या जीवनमृत्यूच्या संघर्ष रेषेवर जाऊन आल्या. या पुस्तकातल्या पहिल्याच लेखाचे शीर्षक 'चल हॉस्पिटला जाऊ' असे आहे याचे त्यामुळे आश्चर्य वाटू नये. त्या लेखात खरे तर रुग्णांना वेळी अवेळी हॉस्पिटलमध्ये भेटायला जाणाऱ्यांचा कसा त्रास होतो याचे काही किस्से दिले आहेत. त्या रुग्णादेखत आजारपणाची, कोणाच्या मृत्यूची वगैरे चर्चा करण्यात येते. अंजलीबाई सल्ला देतात : पेशंट घरी गेल्यावर शांतपणे भेटायला जाणे सर्वात भले! पण लोक तेवढा दम काढत नाहीत. हे त्यांचे चुकतेच!

आपले असे अनेक बाबतीत चुकत असते. त्यामुळे आपल्याला जसा त्रास होतो तसा इतरांनाही होतो.

माणसाची सगळी धडपड चाललेली असते ती सुखासाठी, शांतीसाठी. मनःस्वास्थ्यासाठी. जगणे अर्थपूर्ण करण्यासाठी. सगळे काही आनंदमय असावे, मनासारख्या सर्व गोष्टी घडाव्या, आपल्या इच्छेप्रमाणे जग चालावे, आपण जगाच्या केंद्रस्थानी असावे आणि इतरांनी आपल्या तालावर नाचावे असेही वाटत असते. पण हे सर्व जमून येतेच असे नाही.



अंजली ठकार यांना वाटते की हे भरकटणारे मन ताब्यात आले तर बरेच प्रश्न सुटतील. निसर्ग चिरंतन उत्फुल्ल असतो. ऋतू वेळेवर येतात. त्यांच्या वक्तशीरपणात फरक पडत नाही. आपण मनाला काबूत आणण्यासाठी नियमित प्रयत्न केले तर नक्की फरक पडू शकेल. त्यासाठी कोणत्या क्लासला वा केंद्रात जाऊन फारसा फायदा होतोच असे नाही. आपणच आपले गुरू होऊन, आपल्या मनावर नियंत्रण मिळवले पाहिजे. हे काम अवघड आहे तसेच सोपेही आहे. एकदा तुमच्या मनाने ते ठरवले तर खरोखर अवघड नाही. आरोग्य चांगले राहिले, व्याधी उपाधी नसल्या तर स्वास्थ्य मिळते. ते टिकवण्यासाठी वेळेवर झोपणे, वेळेवर उठणे, व्यायाम व शरीरश्रम करणे, मन व शरीर यांचा मेळ साधणे आवश्यक. हे जर स्वतःला पटले तर तुम्हाला अन्य कोणा व्यक्तीचे गुरू म्हणून पाय ठेवायची, सुधारणा करीत राहायचे. कधीतरी सुखशांतीचा मार्ग गवसेल असे त्यांना वाटते.

''हटातटाने पटा रंगवुनि जटा धरिसि का शिरी– मठाची उठाठेव का करी?'' असा प्रश्न रामजोशींनी विचारला. त्याचा दाखला देत अंजलीबाई म्हणतात : सत्य आणि असत्य या नाण्याच्या दोन बाजू नाहीत. ते जुळे भाऊ आहेत. सारेच चोर आहेत. खोटारडे आहेत. देवाने दिलेले शुद्ध मन अशुद्ध करून लोक जगत राहतात. हे गलिच्छ मन फेकून दुसरे नवे मन आणता आले तर? उजळ माथ्याने ताठ मान करून जगता येईल की नाही?

वय वाढते तसे आपल्याच घरात आपण उपरे ठरत जातो. संध्याछाया भिववू लागतात. दोन पिढ्यांमधले अंतर वाढू लागते. सुनामुलांच्या मैत्रिणी आल्या की आपण अडगळीसारखे ठरतो. निसर्गातील पानगळ बघताना कधी कधी उदास वाटते. पण ती पानगळ नवी पालवी फुटण्याची पूर्वतयारी म्हणून असते हे लक्षात घेतले की हा उदासपणा दूर होतो. निसर्गाचा व्यवहारच असा आहे की गलितगात्र वृद्धांना वर न्यायचे आणि त्याच ट्रॉलीतून लेकरे खाली आणायची. आपण गेलो तरी कोणाचे काही अडणार नाही. देहाच्या पिंजऱ्यातून आत्मा उडून जातो आणि सद्‌गती मिळते. पण लोक पळभरच नव्हे तर सततच हाय हाय म्हणत राहतात. ही एक चूकच!

खरं तर बालपण, तारुण्य, वार्धक्य, सारं काही मस्त भोगण्यात आनंद असतो. तो आनंद लुटा. त्यासाठी पैशाची रेलचेल लागत नाही. विनोदाची रेलचेल मात्र हवी. चिंतातुर जन्तू असून चालत नाही. दुसऱ्याला मोकळेपणाने दाद देण्याएवढा मनाचा उमदेपणा हवा. आपले एवढेसे आयुष्य. अध्यात्माचे ड्रॉप्स डोळे, कान, कंठ यात घालावेत; म्हणजे जन्माचे सार्थक झालेच असे समजा. नाहीतर जन्म तसाच पाणी वाहता वाहता संपायचा. शांती मिळेल का हो बाजारी? ही कवितेची ओळ. शांती हवीशी वाटतेय तोवरच ती मिळवा. एरवी ती काळ्याबाजारीही मिळणार नाही. जवानीची रेल खडखडत रखडणार नाही. सुखशांतीच्या शोधात अनेक विषय येतात. अंजली ठकार एखादी कविता, एखादी घटना घेऊन, तिच्या अनुषंगाने स्वैर चिंतन करीत जातात; आणि त्या ओघात काहीतरी मौलिक सूत्र सांगून जातात.

चरणकमल बनहारे रे हे संत मीराबाईचे पद त्यांना प्रेमाची आच, आर्ताची गत आर्ताची गत आर्ता ठावी, कळ ज्या अंतःकरणी या वेदनेची आच प्रकट करणारे वाटते. मीरेचा नवरा

तिच्या मधुरा भक्तीने प्रथम दुखावला, रागावला. पण पुढे तोच कृष्णभक्त झाला, एवढेच नव्हे तर मीराभक्त झाला. अंजलीबाई आणखी पुढे जाऊन कल्पना करतात की जर मीराने कृष्णाला नवरा मानण्याऐवजी मनोमन तिने नवऱ्यातच कृष्ण पाहिला असता तर आरंभीचा संघर्ष आणि लोकापवाद टळला असता. म्हणून त्या तरुणवर्गाला सल्ला देतात. "हे मीरे, तू जर परमप्रिय सर्वांस । कृष्णभक्त मीराभक्त । मीराभक्त तव पतीही समंजस । वागावे तरुण-तरुणींनी हेचि मनोमनी ठेवीत । मीरेची सुंदर भजने सदैव असावी मुखात." (पृष्ठ २८).

*अस्माकं बदरीचक्रं, युष्माकं बदरीतरुः ।*

*बादरायणसम्बंधात् यूयं यूयं वयं वयम् ॥*

या सुभाषितातला विनोद स्पष्ट करीत ओढूनताणून संबंध जोडायच्या मानवी प्रवृत्तीवर त्यांनी भाष्य केले आहे. ते करता करता त्या म्हणतात, "बोरीला बोरे येतात. तशीच पोरींना पोरे होतात. बोरांइतकीच गोड आणि गोंडस. अहो, निसर्गाचा खेळच की तो! हे एकदा लक्षात घेतलं की प्रेमाचे नवे समीकरण सुचते, "कुठला तरी मुलगा, कुठली तरी मुलगी, ओळखीपाळखीतून, बादरायण संबंधातूनच एकत्र येतात. सौख्यभरे नांदतात. आणखी काय हवे? तेव्हा ग्रहाबिहांचा आग्रह सोडा, भले बादरायण संबंध जोडा. मग तुम्ही तुमचे, आम्ही आमचे." (पृष्ठ २३)

'कधी करिशी लग्न माझे तुज ठावे ईश्वरा' या लेखातही अंजली ठकार फालतू पत्रिका प्रकरणाला फाटा देण्याचा सल्ला देतात. सुखासुखी अविवाहित राहणे ही तर एक प्रकारची आत्महत्याच असे बजावून त्या म्हणतात : "ज्या वयात जे व्हायला पाहिजे ते व्हायला पाहिजे. ते आयुरारोग्यासाठीही अतीव महत्त्वाचे... वेळीच वाट मोकळी होते. तुमच्याही वाटा मोकळ्या होतात... निसर्गाने घालून दिलेली घडी विस्कटण्याचा कोणासही अधिकार नाही. अगदी लग्नबंधनापासून तो नद्या अडवून धरणे बांधण्यापर्यंत... यौवन वाया घालवणे एकूण चूकच!"(७१)

## विवाह खर्च

एकदा कोणी जोडीदार भेटला की उतावळ्या प्रेमिकाला गुडघ्यास बाशिंग कधी बांधू असे होऊन जाते. उद्याच लग्न होईल तर किती गोड! पण लग्न हा मातापित्यांच्या चढाओढीचा, स्पर्धेचा विषय. हजार पानं. कार्यालय. पहिलेच कार्य. तेही अद्वितीय सुपुत्राचे– असे एकेक अहंचे आणि श्रीमंतीचे प्रदर्शन सुरू होते. याबद्दलही अंजलीबाई जर तिरकसपणे बोलतात. हे सर्व करण्यापेक्षा नोंदणी पद्धती किती सुटसुटीत, सोपी, कमी खर्चाची असे त्या सुचवतात. (७६).

लग्नात हौसमौज हवीच. गर्दीही हवीच. मग जेवणाचे ताट मिळावे म्हणून ताटकळत उभे राहणेही क्रमप्राप्तच. अंजली ठकार यांना लग्नातल्या या जेवणावळीवरचा खर्च अनाठायी वाटतो. केटरर्सना खिरापती वाटण्यापेक्षा गरीब होतकरू छात्रास तेच वित्त उपयुक्त ठरू शकेल. त्यामागचा आणखी एक व्यापक विचार त्या सांगतात. रामनामाचा मोट नाडा हाती असावा. पाणी एक खळगा भरून पुढले अनेक खळगे भरण्यास धावत सुटते. तसेच आपणही रामनामी रमून सर्वांपर्यंत त्याचा प्रसार करायला हवा. बरड असेल तरी पाणी खेळत राहील. सुपीक असेल तर फुलत राहील. एका हाती मोटनाडा, पाणी जाते फुलझाडा." (१०७)



## रामनामाचा संदर्भ

रामनामाचा संदर्भ इतरही अनेक लेखात येतो. हा मंत्र एकमेवाद्वितीय असून अखिल विश्वात्मक व आपपरभाव न मानणारा आहे, असे त्यांना वाटते. (११६). रामनामाने करवादलेल्या मनाला शांतता लाभते. रामनाम घ्या, गा, वाचा, लिहा, प्रसार करा. फुले जसे सुवासाचे प्रसारण करतात... श्रीराम व सीता यासारखे आदर्श यापुढे संभवणे कठिण. परंतु कुटुंबप्रमुखाचे काही कर्तव्य असते ते बजावण्याइतका राम तरी नवऱ्यात राहू द्या. रामरंगी रंगून जगावे. जन्माचा तसेच मृत्यूचा सोहळा गोड करावा. (१२०). रामनाम म्हणजे अध्यात्म रसायनाचे इनॉक्युलेशन. तापत्रयांतून मुक्त करणारे. न खुपणारे. न जाचणारे. (१२२). रामनाम हेच रत्न; राम हेच अमूल्य धन. जन्मभर मन रामनामाने शांत ठेवाल तर साधे इंजेक्शन घेतानाही फुका हुंदका फुटणार नाही. (१२९) रामनाम निखळ सद्बुद्धी देते. मग दुर्बुद्धी देणारा कोण? तो दुसरातिसरा कोणी नसून आपल्यातला अहं असतो. परमेश्वराने आपल्यापुढे रत्ने माणके ठेवली; दगडधोंडेही ठेवले. आपण निवडून त्यातले अणकुचीदार खडेच उचलेल तर 'हरे राम' शिवाय तो तरी काय म्हणणार कप्पाळ?" (१४२).

आम्ही काय कुणाचे खातो रे, तो राम आम्हाला देतो रे असे समर्थांनी म्हटले आहे. पैसे खायचे ना? प्वाटभर खा. वंगाळ व्हईतो खा. पण खरे सांगा. नावे, पत्ते, गावे. ते कसं वं, मग मपली पोटापान्याची चैन चैन तुटंल न्हवं? या बाजारबुणग्यांना राम शोधून तरी सापडेल का? कोणाच्या मुखी? कोणाच्या लेखी? कोणाच्या सुखीदुःखी? खरं सांगायचं तर आपली सारी थेरं पाहून श्रीरामानेच आपणास लोटांगण घातले आहे. त्याला हळुवारपणे उठवा आणि सामुदायिकपणे सहस्र लोटांगणे घातले आहे. त्याला हळुवारपणे उठवा आणि सामुदायिकपणे सहस्र लोटांगणे घाला. तो खडबडून जागा होऊन उठेल. तुमचा निढळाचा घाम पुसेल. तुम्हाला काम देईल. धाम देईल; आणि स्वतःसंगे म्हणायला लावील. आम्ही काय कुणाचे खातो रे; श्रीराम आम्हाला देतो रे." (१५१). म्हणून रामनामाकडेही चित्ताचे डायव्हर्शन करा. हृदयस्थ परमेश्वराला तनमनधन वाहून जपा. (१५३). नामजप हा लाखमोलाचा ठेवा आहे. कधी न सरणारा. वाचेस लळा लावणारा. हा आत्माराम श्रीराम सर्वत्र सदारंग भरलेला आहे. मुखशुद्धीसाठी लवंगसुपारी, तसे मनशुद्धीसाठी नामजप राम प्रहरी. (१५५).

बऱ्याच व्यावहारिक गोष्टींवर भाष्य करीत अंजलीबाई ठकार शेवटी रामनामाच्या अथांग सागरात स्वतःला झोकून देतात. वाचकांनाही त्यात विहार करायला सांगतात. रामनाम हाच सुखशांतीचा मूलमंत्र ठरू शकतो; रामनामाने ऐहिक जीवनातले ताणतणाव, नात्यानात्यातले दुरावे, व्यवहारातले संघर्ष, मनाचे कृपणपण व मालिन्य इ. दूर होऊ शकतात. साऱ्या सृष्टीशी एकतानता होऊ शकते. निसर्गाशी मैत्र जुळू शकते. आनंदाच्या डोही आनंद तरंग यासारखी अवस्था नित्य अनुभवाचा भाग बनू शकते.

खूप खूप आत्मक्लेश आणि आजारपण यातून पार पडून अंजलीबाईंना हा जो साक्षात्कार झाला आहे, त्यात त्या वाचकांनाही सामील करून घेत आहेत, हा त्यांचा मोठेपणाच!

**पृष्ठे** १५५ **किंमत** :१००रु. **सवलतीत** : ८५रु. **सभासदांना** : ७५रु. **पोस्टेज** :१५रु.

# क्रोमोझोम - ६

## अनु. : वैशाली जोशी

**एक चित्तथरारक संकल्पनेचा सर्वंकष मागोवा घेणारी वाचनीय कादंबरी**

क्रोमोझोम-६ ही पाचशेवर पृष्ठांची डॉ. राबिन कुक यांची कादंबरी जैवतंत्रज्ञानाच्या अत्याधुनिक संशोधनाचा वापर वैद्यकीय आणि अन्य क्षेत्रात करून अवाढव्य संपत्तीचा हव्यास धरणाऱ्या आजच्या चंगळवादी मनोवृत्तीचे नाट्य प्रगट करते.

डॉ. राबिन कुक यांचे कथानिवेदनाचे तंत्र हॅरॉल्ड रॉबिन्स, फ्रेडरिक फोरसीथ, जॅफ्रे आर्चर, मायकेल क्रायटन, मारिओ पुझो यांच्यासारख्या बेस्टसेलर लेखकांच्या पठडीतले असून एका छोट्याशा घटनेभोवती रोमांचकारक अशा उपकथानकांची मलिका गुंफून वाचकाला त्यात खेचून घेण्याची त्यांची चतुराई विलक्षणच म्हणावी लागेल.

क्रोमोझम-६ मधील घटनांची मालिका दि. ३ मार्च ते १० मार्च एवढ्या म्हणजे एका आठवड्यात घडते. न्यूयॉर्क, बोस्टन आणि कोगो इक्वेटोरियल गिनी (आफ्रिका खंड) अशा तीन ठिकाणी प्रामुख्याने या घटना घडतात. न्यूयॉर्क व कोगो या दोहोतील वेळेमध्ये फरक असतो. प्रत्येक प्रकरणाच्या आरंभी तारीख, वेळ व स्थळ यांचा ७ वाजून २५ मिनिटे, न्यूयॉर्क, किंवा ४ मार्च दुपारी १ वाजून १० मिनिटे कोगो इक्वेटोरियल गिनी इत्यादी. त्यामुळे हे थरारनाट्य आंतरराष्ट्रीय परिमिती असलेले आहे हे सारखे मनावर ठसते.

या थरारनाट्याच्या केंद्रस्थानी आहे डॉ. केविनचे क्रोमोझोम-६ विषयक संशोधन. एका पेशीतून क्रोमोझोनचा एखादा तुकडा बाहेर काढून त्या जागी दुसऱ्या पेशीतला तसलाच तुकडा बसवण्याचे तंत्र त्याने विकसित केले आहे; क्रोमोझोमच्या अदलाबदलीच्या या संशोधनाविषयी 'अमेरिकन असोसिएशन फॉर दि ॲडव्हान्समेंट ऑफ सायन्स' या संस्थेत केबिन एक पेपर सादर करतो; आणि प्राण्यांच्या अगर वनस्पतींच्या एखाद्या विशिष्ट वर्गामध्ये आजूबाजूच्या परिस्थितीशी अधिक चांगल्या तऱ्हेने जुळवून घेण्यासाठी क्रोमोझोमच्या तुकड्यांची अदलाबदल केली जाते; त्यामुळे प्राण्यांचा किंवा वनस्पतींचा जो वर्ग उत्क्रांत होतो. सुधारतो. ही प्रक्रिया लिंगपेशीच्या उत्पत्तीमध्ये अधिक वेळा होते. तिला मीइऑसिस असे नाव आहे. हार्वर्ड विद्यापीठात केबीनचे पीएचडीसाठी ह्यावर संशोधन चाललेले असते. व्याख्यानानंतर डॉ. लीयान्स रेमंड



त्याला भेटून या कल्पनेचा वैद्यकीय उपयोग होऊ शकेल, त्यासाठी संशोधन करण्यासाठी स्वतंत्र प्रयोगशाळा व इतर सोयीसवलती देण्याचा प्रस्ताव त्याच्यापुढे ठेवतात.

सध्या अवयवारोपणाच्या शस्त्रक्रिया केल्या जातात. त्यात अनेक रुग्णांबाबत ते अवयव नाकारले गेल्याचा अनुभव येतो. प्राण्याच्या शरीरातील एखादा अवयव वा पेशीसमूह काढून तो मानवी शरीरात बसवणे याला झीनोग्राफ्ट म्हणतात. उदा. डुकराच्या हृदयातील झडप काढून ती माणसाच्या शरीरात बसवणे. परंतु अनेकदा माणसाचे शरीर अशा अवयवांचा स्वीकार करीत नाही. त्यामुळे रुग्ण व्यक्तीला शस्त्रक्रिया करूनही फायदा होत नाही.तेव्हा एखाद्या व्यक्तीची प्रतिकृती तयार केली आणि त्या प्रतिकृतीतील आवश्यक पेशीसमूहातील मूळ व्यक्तीच्या बिघडलेल्या वा विकृत पेशीसमूहाच्या जागी बसवल्या तर तो नाकारला जाणार नाही.

डॉ. केविनच्या संशोधनानुसार माणसाचीच एक प्रतिकृती माकडाच्या रूपातील तयार करायची; आणि त्या माकडातील तो विशिष्ट अवयव त्या माणसाच्या शरीरात बसवायचा. तेव्हा तो नाकारला जाण्याचा धोकाच उरत नाही. डॉ. रेमंड यासाठी एक स्वतंत्र जेनसिस अशी कंपनी काढून, श्रीमंत लोकांसाठी त्यांच्या माकडाच्या रूपातील प्रतिकृती तयार करण्याची योजना आखतो. ती प्रतिकृती पोसण्यासाठी ठराविक वार्षिक शुल्क आकारले जाते. त्या माणसाचा हृदय, लिव्हर किंवा अन्य कुठला अवयव बिघडला तर त्या प्रतिकृतीच्या शरीरातूनन तो अवयव काढून बसवला की झाले! आपल्याला भावी काळात जर एखादा रोग झाला आणि अवयवारोपणाची वेळ आपल्यावर आली तर आपल्याला ही गोष्ट अनायासे करता येईल या विचाराने लाभणाऱ्या मन:शांतीसाठी श्रीमंत धनिक खर्चाला मागेपुढे पाहणार नाहीत हा डॉ. रेमंडचा अंदाज. तो खरा ठरतो.

हा प्रकल्प गुप्त ठेवण्यात येतो. श्रीमंत रुग्ण मिळवण्यासाठी डॉक्टर्सची मदत घेण्यात येते. प्रत्येक रुग्णासाठी काही रक्कम मिळत त्यांना जाते. 'पिरॅमिड' विक्रीतंत्राचा त्यासाठी वाापर केला जातो.

हा प्रकल्प प्रत्यक्षात आणण्यासाठी माणसाशी जास्तीत जास्त मिळताजुळता प्राणी म्हणून बोनोबो चिंपांझीची निवड करण्यात येते. आफ्रिकेतील एका छोट्या देशातील घनदाट जंगलात त्यासाठी चिंपांझीची वसाहतच स्थापन करण्यात येते. माणसाच्या चेहऱ्याशी पष्कळ साम्य असणारे बोनोबे हे मध्य झायरेती जंगलात एकांतात, इतर प्राण्यांपासून दूर राहिलेले. त्यांच्यात मातृसत्ताक पद्धत होती. मोठ्या टोळ्या असत. त्यांना पिंजऱ्यात ठेवण्यात येईल. त्यांच्या पेशी समूहातील क्रोमोझम-६ मध्ये बदल करून त्यात विशिष्ट व्यक्तीच्या क्रोमोझोम-६ घालण्यात येतात. म्हणजेच मूळ व्यक्तीची माकडाच्या रूपातील प्रतिकृती तयार होते. जंगलात ती वाढत राहते; आणि जेव्हा वेळ येईल तेव्हा तिचा हवा तो अवयव काढून मूळ व्यक्तीच्या शरीरात त्याचे रोपन करता येतो. या प्रकल्पासाठी डॉ. केबिनला आवश्यक तशी सुसज्ज प्रयोगशाळा उभारून देण्यात येते. पाच वर्षात हा प्रकल्प चांगलाच विकसित होतो. चिंपांझीच्या रूपातील प्रतिकृती कोगोच्या निबिड अरण्यातील विशिष्ट बंदिस्ती भागात जगत वाढत राहतात. नर व माद्या अशा दोहोंचा त्यात समावेश असतो. डॉ. केविनला मात्र कधी कधी आपली विवेकबुद्धी

टोचतेय असे वाटते. का? तर आपण वैज्ञानिक आहो. विज्ञानाचा वापर मानव जातीसाठी करून घेणे हा आपला प्रांत नाही. या प्रकल्पाच्या गुप्ततेमुळेही त्याच्या मनावर कायम दडपण राहते. कारण प्रयोगशाळेचा तो मुख्य असला तरी सुरक्षा अधिकारी व इतर व्यक्ती यांचा तेथे धाक असतो. अशा बोनोबोच्या रूपातल्या त्या प्रतिकृतींवर संगणकाद्वारे नियंत्रणगुप्त ठेवण्यात येते. विशिष्ट नंबरावरून ते कोणत्या व्यक्तीची प्रतिकृती आहेत ते ओळखता येते.

या गुप्त प्रकल्पाचा गौप्य स्फोट व्हावा अशी एक घटना घडते आणि सर्वच संबंधितांना हादरा बसतो.

न्यूयॉर्कमधील एक कुप्रसिद्ध गुंड कार्लो फ्रँकोनी याचा गोळ्या घालून खून केला जातो. त्याचे प्रेत पोस्ट मार्टेमसाठी हॉस्पिटलमध्ये नेण्यात येते. तपासणी होण्याच्या आधीच ते प्रेत शवागारातून गायब होते; आणि तेथील पोलीस खाते खडबडून जागे होते.

दोन दिवसांनी ला शवागारात आणखी एक मुंडके व हातपाय नसलेले प्रेत येते. त्या मृतदेहाच्या यकृतावर गोळ्या झाडून ते छिन्नविच्छिन्न करण्यात आलेले असते. त्यामुळे गुन्हेगारी रोगनिदानतज्ज्ञ डॉ. जॅक स्टेपलटनचे कुतूहल चाळवले जाते. हा देह हॉस्पिटलच्या शवागारातून पळविण्यात आलेल्या कार्लो फ्रँकोनीचाच आहे हे डॉ. लॉरी मॉन्टगामेरी या सहायक डॉक्टरच्या मदतीने त्याच्या लक्षात येते आणि चौकशीची सूत्रे सुरू होतात. एका फ्युनरल होममध्ये त्याच काळात एक प्रेत हलवण्यात आलेले असते; त्यावरून पोलीस अधिकारी व डॉ. लॉरी तेथे चौकशीला जातात. चौकशीनंतर घरी आलेल्या लॉरीला दोन गुंड धमकावतात. ते आधीच तिच्या घरात घुसून बीयर पीत बसलेले असतात. ''फ्रँकोनी केसचा नाद तुम्ही सोडावा हे अगदी सौम्यपणे सांगण्यासाठी आम्ही येथे आलो आहोत. तसे आम्ही फार चांगले लोक आहोत. फ्रँकोनीला कोणी मारलं ते आम्ही तुम्हाला सांगायला तयार आहोत. तो काही चांगला माणूस नव्हता. म्हणून त्याला ठार मारण्यात आलं. खुन्याचं नाव आहे व्हिडो डेल्बारिओ.... तेव्हा फ्रँकोनीच्या केसचा नाद सोडा. हा अँजेलो तुमच्यावर सूड उगवायला टपलेला आहे. पण तुमचं नशीब चांगलं. आमच्या बॉसचा तडजोडीवर विश्वास आहे....'' जाता जाता लॉरीच्या आवडत्या मांजराची मान मुरगाळून अँजेलो त्या मांजराचा निष्प्राण देह लॉरीच्या मांडीवर टाकतो. (३३३), लॉरीला भयंकर धक्का बसतो. ती टॉम या मांजराचं मृत शरीर स्टायरोग्राफच्या पेटीत ठेवून त्याच्यावर बर्फाचे खडे ओतते.

इकडे मृत माफिया फ्रँकोनी याच्या पोस्टमार्टेममध्ये त्याच्यावर झालेल्या यकृताच्या आरोपणाच्या शस्त्रक्रियेचे गूढ गडद होते. ही शस्त्रक्रिया कुठे झाली याची चौकशी करता अमेरिकेतील व युरोपातील सर्व संबंधित हॉस्पिटल्सकडून नकार येतो. मग ती झाली कुठे? फ्रँकोनीचे यकृतारोपण झालेले आहे. पण डीक्यू अस्फामधल्या सर्व न्युक्लिओटाइडसचा क्रम शेवटपर्यंत सारखा असतो. टेड ली हा तज्ज्ञ सांगतो की ''शास्त्रीय दृष्टिकोनातून विचार करता हे अशक्य आहे. क्रोमोझोम्समध्ये आम्लारीच्या मूलभूत जोड्यांचे लाखो क्रम असतात. ते इतके पूर्णपणे कसे काय जुळतात हेच मला कळत नाही. डीक्यू अल्फा इतके सारखे असलेला यकृताचा देणगीदार कुठून मिळाला याचे स्पष्टीकरण मिळत नाही. अतिमानवी शक्तीमुळे असे काही योगायोगाने घडल्यासारखे वाटावे-इतके हे प्रकरण विलक्षण आहे... इथे काहीतरी चुकतेय असे मला वाटतेय.'' (२७७)



प्रयोगशाळेतल्या तपासणीत फ्रँकोनीच्या शरीरात सायक्लोस्पोरिन ए किंवा एफ के ५०६ या पैकी एकही औषध सापडत नाही. अशा यकृतारोपणाच्या ऑपरेशननंतर तो अवयव नाकारला जाऊ नये म्हणून त्यांचा वापर करणे क्रमप्राप्त असते. (२७९)

डॉ. जॅक स्टेपलटन पोलिस हेडक्वार्टरमधील लेफ्टनंट डिटेक्टिव्ह लू सोल्डॅनो याला फोन करून फ्रँकोनी यकृतारोपणासाठी परदेशी गेला असला तर ती माहिती कस्टमकडून मिळविण्याची विनंती करतो.

इकडे कोगोमध्ये डॉ. केविन याला बोनोबांच्या जंगली वसाहतीत धूर दिसल्याने, भलभलत्या शंका येऊ लागतात. बोनोबोमध्ये नर आणि माद्या यांचे प्रमाण संतुलित नसल्याने संघर्ष होत असावा, किंवा त्यांना विस्तव तयार करण्याची युक्ती सापडली असावी. कॉंप्युटरवरून बोनोबोंच्या हालचालींचा मागोवा घेताना मात्र या धुराचा उगम कुठे आहे हे लक्षात येत नाही. त्यातल्या दोन बोनोबोंची हालचाल दिसत नाही; त्यामुळे ते मेले असण्याची शक्यताही जाणवते. आणि त्याची खातरजमा करण्यासाठी या बेटावर जावे असे केविनला वाटते. परंतु त्याला तेथे जाण्यास मज्जाव असतो. (२२६) त्या बेटाला जोडणारा एकच पूल असतो. तिथे सिक्युरिटीचा कडक बंदोबस्त असतो. चोरून तेथे जाणे अशक्यच! शिवाय बेटावर जाणे हा तेथील कायद्यानुसार मृत्युदंडाला पात्र असा गुन्हा होता.

या ट्रान्सजेनिक बोनोबोमध्ये केविनचीही प्रतिकृती असते. आपल्याच प्रतिकृतीला भेटायची कल्पना त्याला चमत्कृतिपूर्ण वाटते. बारा चौरस मैल बेटात स्वत:च्या त्या प्रतिकृतीला शोधणे हा विचार त्याला थ्रिलिंग वाटतो. या बोनोबोंमध्ये दोन गट दिसतात. ते दोन पायांवर चालताना दिसतात. त्या बेटावर जाण्याची एक योजना केबीन आणि त्याच्या दोन सहकारी मैत्रिणी (पुनरुत्पादन तंत्रज्ञ मेलनी आणि हॉस्पिटलमधील परिचारिका कॅंडेन्स.) बनवतात.

इकडे न्यूयॉर्कमध्ये फ्रँकोनीचा मृतदेह हॉस्पिटलमधून बाहेर कसा नेला गेला, फ्युनरल होमचा त्यात कितपत सहभाग होता, फ्रँकोनीवर शस्त्रक्रिया कुठे झाली, यकृतारोपणात इतके सारखे डीएनए असणारे यकृत कसे मिळाले, वगैरे प्रश्नांचा छडा लावताना आफ्रिकेत कोगोमध्ये जेनसिसचा एक माकडांचा फार्म आहे वगैरे माहिती डॉ. जॅक व लॉरी यांना मिळते. तेव्हा तेथेच जाऊन या प्रकाराचा उलगडा करण्याची कल्पना त्यांच्या डोक्यात वळवळते.

....न्यूयॉर्कहून ही मंडळी कोगोमध्ये जातात; त्याचप्रमाणे केविन कोगोमधील आपल्या प्रयोगशाळेतून बोनोबोंची वसाहत असलेल्या बेटावर प्रवेश करण्यात यशस्वी होतो.

त्या साहसाची रोमहर्षक कहाणी क्रोमोझोम-६ मध्ये वाचायला मिळते.

विज्ञानातील एखादी कल्पना, तिचा फायदा उठवणारे हुशार साहसी उद्योजक, त्यातून उभे राहणारे आंतरराष्ट्रीय प्रकल्प, त्यांच्यामधील तंत्रज्ञानविषयक गुप्तता, त्यात एखादीही अपघाती घटना घडली की त्या प्रकल्पाला बसणारा हादरा-यावर ही कादंबरी प्रकाश टाकते; त्याचबरोबर शास्त्रज्ञही आपल्या संशोधनाचा वापर हा मानवतेच्या हितासाठी व्हावा, त्यात गैर काही घडू

नये, त्या प्रयोगातील धोक्यांचा सत्यान्वेषी बुद्धीने छडा लावावा याबद्दल जागरूक राहतात; असेही एक सूत्र या कादंबरीत दिसते.

प्रत्येक व्यवसायाची काही शिस्त असते; काही कार्यपद्धती असते; काही मूल्यप्रणाली असते. शास्त्रज्ञ, डॉक्टर, पोलिस, सुरक्षा अधिकारी, परिचारिका, गुन्हेगार व माफिया डॉन– प्रत्येकाला व्यक्तिमत्त्व असते. त्याचे व्यावसायिक नीतिनियम आणि त्याची माणूस म्हणून असणारी कर्तव्ये यांचाही संवादी-विसंवादी मेळ वेगवेगळ्या स्तरांवर जाणवतो. थरारकथा लिहितानाही या व्यापक पार्श्वभूमीकडे बारकाईने पाहण्याची पाश्चात्य लेखकांची दृष्टी व प्रवृत्ती सध्या कल्पनेलाही भव्यता प्रदान करते. 'बेस्टसेलर' ठरायलाही खूप परिश्रम घ्यावे लागतात. तपशीलांचे बारकावे आणि कथाकथनकौशल्य या दोहोंची उचित सांगड घालावी लागते. तसेच अवघ्या दहा दिवसात या कादंबरीतील सर्व घटना घडल्याने त्यात गतिमानताही जाणवते.

'क्रोमोझोम-६' ही वैज्ञानिक तपशीलावर आधारलेली प्रदीर्घ कादंबरी वाचतानाही वाचक रंगून जातो. तिच्यातील पात्रे त्याला जिवंत, चैतन्यपूर्ण वाटतात. त्यांची व्यावसायिक कुशलता त्याला स्तिमित करते; विज्ञान तंत्रज्ञानातील अद्ययावत् संकल्पनांचा क्रांतदर्शी वापर करण्याचे आव्हान पेलण्याची विलक्षण क्षमता पाश्चात्य लेखक दाखवतात. या कादंबरीत वर्तविलेल्या शक्यता प्रत्यक्षातही नजिकच्या भविष्यकाळात खऱ्या झालेल्या दिसल्या तर नवल नाही.

**पृष्ठे** ५२० **किंमत** :३५०रु. **सवलतीत** :२९८रु. **सभासदांना** :२६३रु. **पोस्टेज** :१५रु.


## वाचकाला विविध अनुभवातून नेणारे सुंदर कथासंग्रह

| पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत |
|---|---|---|
| खिडकीलाही डोळे असतात | डॉ. बाळ फोडके | ११०रु. |
| कावळे आणि माणसं | उत्तम कांबळे | ११०रु. |
| कथा सावलीची | माधवी देसाई | ७०रु. |
| उत्तरार्ध | विजया राजाध्यक्ष | १२५रु. |
| ॠतूवेगळे | आशा बगे | ६०रु. |
| निसटलेले | आशा बगे | १००रु. |
| खसखशीचा मळा | द. ता. भोसले | ७५रु. |
| मुळे आणि पाळे | वसंत नरहर फेणे | ८०रु. |
| शेष अवशेष | अरविंद रे | १२५रु. |
| कालिंदीच्या तीरावरती | य. दि. फडके | ७५रु. |
| पोस्ट-मार्टेम | प. बा. सावंत | १२५रु. |




# कातरवेळ

**एम्. डी. लहानकर**

## परिस्थितीच्या रेट्याने अगतिक झालेल्या माणसांच्या व्यथावेदना

नांदेडचे एम. डी. लहानकर यांनी गेल्या आठ-दहा वर्षात मोजकेच पण कसदार लेखन करून वाचकांचे लक्ष वेधून घेतले आहे. सांजधारा आणि पहाटवारा हे दोन काव्यसंग्रह, डोहतरंग आणि आवर्त हे कथासंग्रह, गाजव्यथा ही कादंबरी अशी त्यांची पाच पुस्तके निघालेली आहेत. कातरवेळ हा नवा कथासंग्रह मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे नुकताच प्रकाशित झाला आहे. त्यात अस्वल, घाणा, भूक, वाटसरू, अंधारयात्रा आणि उद्याचा आमदार अशा सहा कथा आहेत. या कथा १९९४ ते १९९७ या काळात दिवाळी अंकांतून आलेल्या आहेत. जी. ए. कुलकर्णी यांच्या शैलीचा प्रभाव त्यांच्यावर पडलेला दिसतो.

जीवनाकडे ते काहीशा अलिप्त जिज्ञासेने, उपरोधिक नजरेने बघतात.

'गोविंदराव हा फाटक्या अंगाचा माणूस... बिगनेशी गावात भूछत्र उगवावे तसा पंधरा-वीस वर्षांपूर्वी बसवेश्वर मंदिरालगतच्या धर्मशाळेत दिसला... मळून काळीकुट्ट झालेली पंख्यासारखी पनामा विजार आणि आडव्या पट्ट्या जोडून नागमणी कापडाचा गंजीफॉक घालून अनवाणी पायाने त्याने... जागेसाठी पन्नासजणांकडे दातांच्या कण्या केल्या; अखेर भुंड्या शिवरामच्या घरामागील एकेकाळच्या गाडीतळाची जागा चार पत्रे घालून पंधरा रुपये भाड्याने त्याला मिळाली.'

अशी माहिती देताना 'फाटक्या अंगाचा', मळून काळीकुट्ट झालेली पंख्यासारखी पनामा विजार... भुंडा शिवराम वगैरे उल्लेख जे येतात, त्यातून एकूण निवेदकाचा तुच्छतेचा वा उपरोधाचा सूर लक्षात येतो. गोविंदराव असे म्हणतानाच त्याचा एकेरीच उल्लेख कथेत येतो.

या गोविंदरावाच्या मिशांबद्दल कथालेखक जो तपशील देतो त्यातही मिस्किलपणापेक्षा कुचेष्टेचा भाग जास्त दिसतो.

''कुणाच्या चिंचेच्या आकड्यासारख्या टोकाला पीळ देऊन केलेल्या अक्कडबाज मिशा, कुणाच्या तलवारछाप, कुणाच्या ढेकूणछाप तर कुणाच्या छपरीछाप... पण गोविंदरावाच्या मिशा मात्र जागजागी उंदराने कुरतडल्यासारख्या होत्या. त्याच्या दाढीचे हनुवटीवरच आठदहा

केस उगवत. त्यामुळे महिना-महिना दाढी करायची गरज भासत नसे. तो बोलू लागला की त्याच्या दाढीचे केसही हलत... त्याच्या गालाची हाडे नकट्या टेकाडासारखी उंच होती आणि चेहरा पाणचट दुधावरील सायीसारखा बेचव दिसे. कपाळावरील उभी शीर मोठी टचटचीत होती व तो बोलू लागला म्हणजे मळकट मांजराचे कातडे ताणल्यासारखा त्याचा चेहरा अजागळ दिसे...''(२७)

अशा या तुच्छतेच्या सुरात गोविंदरावच्या आयुष्याची रडकथा आपल्यापुढे उलगडत जाते. जुन्या सिंगर शिवणयंत्रावर तो टेलरकाम करी. गावातले गिऱ्हाईक त्याच्याकडे सहसा येत नसे. ते गणू शिंप्याकडे जाई. शनिवारी बाजारच्या दिवशी आसपासच्या खेड्यामधले गावडे व आदिवासी मात्र त्याच्याकडे कपडे शिवायला टाकत आणि गोविंदरावची चूल आठवडाभर पेटण्याएवढी कमाई करून देत. त्याने मारलेली टिप कापड फाटले तरी उसवत नसे, पण त्याची साधी टिपसुद्धा कधी सरळ नसे. (रस्त्याने बैल मुतत गेल्यासारखी ती टीप वाटे). टेप, गज, टेबल, खडू असल्या फाजील गोष्टींचा वापर तो वर्ज्य मानी; गिऱ्हाईकाच्या अंगाचे माप घेणे त्याला कमीपणाचे वाटे. गिऱ्हाईकाकडे नजरेनेच बघून तो कपडे शिवत असे. त्यामुळे त्याने शिवलेले कपडे (राजकपूरच्या पँटीसारखे) ढगळ तरी होत किंवा ऐनवेळी कापड संपल्यासारखे तोकडे तंग तरी होत. त्या खेडुतांच्या आणि आदिवासीच्या घरात खंडीभर माणसे असल्याने कुणाला तरी ते बरोबर बसत. त्यामुळे फिटिंगबद्दल त्यांची तक्रार नसे.'' (३०)

या गोविंदरावचे पुढे धुरपीशी लग्न होते. काळी, निबर, आकारहीन अशी धुरपी. कुटुंबनियोजनाच्या नर्सची संततिनियमाची पेटी घेऊन वाड्यावाड्यातून फिरायचे काम तिला मिळते. त्यामुळे ती बाहेरच जास्त राहते. तिला मुलगी होते. तीही अशक्त आणि काळी. सारखी रडणारी. तिचा सांभाळही गोविंदरावालाच करावा लागतो. एके दिवशी धुरपी त्या अशक्त मुलीला त्याच्याकडे सोडून निघून जाते. मुलीचा सांभाळ करताना गोविंदरावची तारांबळ होऊ लागते. त्यातच ती आजारी पडते आणि आचके देत प्राण सोडते... गोविंदराव सुन्न मनाने आढ्याकडे बघत उपाशीपोटी बसून राहतो... त्याचे कामातले लक्ष उडते. गिऱ्हाईकही येईनासे होते. सगळे संपले तरी पोट आहे. कुरतडणारी भूक आहे... ही जाणिव तेवढी राहते. (घाणा)

गोविंदरावच्या एकाकी आयुष्याची ही रडकथा कथालेखक लहानकर उपरोध-तुच्छतेच्या वरपांगी शैलीत भेदकपणे सांगतात. त्याच्या अवघ्या अस्तित्वातील अवघडलेपण, पोकळपण ते दाखवतात. आयुष्यात हाती काहीच न लागलेल्या दुर्दैवी व्यक्तीची ही ससेहोलपट इतक्या आत्यंतिक टोकाला नेऊन लहानकर वाचकांना जणू कोंडीत पकडतात. 'भूक'मधील वैजनाथला त्याची सावत्र आई तो मर्तिकाचे विधी टाळतो म्हणून घरातून हाकलून लावते. 'चांगला जंगमाच्या पोटी जन्माला आलास आणि मढ्याला घाबरते डुक्कर. काम नाही केलं तर पोटाला काय बिब्बे घालायचे? तुला नाही ना काम करायचं? मग तुला खाऊपिऊ घालायची आम्हालाही काही हौस नाही. चल, चालता हो घराबाहेर... उचल ते कपडे अन चालता हो आताच्या आता...'(४७). सोळा-सतरा वर्षांचा वैजनाथ त्या रात्री धर्मशाळेत जातो. आई मरून १५ वर्षे झाली तरी तो धर्मशाळेतच राहतो. पूर्वी नागनाथ व मल्लिकार्जुन या आपल्या दोन्ही सावत्र



भावांबरोबर तो अभिषेक, सत्यनारायण, लग्नकार्य, ग्रहदान, वगैरे विधी करीत असे. पंचक्रोशीत लिंगायतांची बरीच घरे होती. ब्राह्मणाचे एकही घर नव्हते. त्यामुळे पूजाविधीतून चांगली कमाई होई. परंतु तो धर्मशाळेत राहू लागल्यावर कामे कमी होत गेली. वैजनाथऐवजी ती त्याच्या भावांकडे जास्त गेली. भावाभावात तणाव वाढत गेला; सावत्र भावांनी मर्तिकाची कामे करण्यासाठी बसवलिंगय्याला तेथे आणले. वैजनाथची आणखीच पंचाईत झाली. सावत्र भाऊ त्यालाच दूषणे देतात. ''भाऊ म्हणून आम्ही होऊन काही कामे त्याच्यासाठी सोडून दिली होती. पण सुखाने चार घास खायचे त्याला मान्य नाही. आमच्याच बुडाखाली बिळ करून आमच्याच नाकदुऱ्या काढू लागला तर कोणाला आवडेल? आमच्याशीच कृतघ्नपणा?''

वैजनाथला हे ऐकून राग येतो. ''कोण कृतघ्न? तू का मी? अरे मी कृतघ्न असतो तर असा उपाशी पोटी जगलो नसतो... माझंच चुकलं. तुम्हाला कधी सावत्र मानलं नाही. सख्ख्या भावासारखं वागवलं. नाहक तळतळाट घेऊ नको...''

पोलिसांना हाताशी धरून हातभट्टीचा धंदा करणाऱ्या पारीला वैजनाथची कणव येई. ''आपल्या जातीचा हा असता तर लग्नाबद्दल विचारता आलं असतं.'' असं ती म्हणे. वैजनाथला ती नेहमी म्हणते, 'स्वामी, जेवणार का?' पण तो नेहमी मला भूक किंवा माझे जेवण झालेय असेच उत्तर देऊन टाळत असे. 'पोटात कुरतडणारी काटेरी भूक... शेतावर भुईमुगाच्या शेंगा वगैरे मिळतात का तो बघे... पाणी पिऊनच वेळ काढी. मर्तिकासाठीही बोलावणे आले की शिधा-दक्षिणा यावर काही दिवस निभावले जात... पण एकूण तब्येतीची हेळसांड... आजारपण.'

एकदा तापाने अंथरुणाला खिळून असताना बसवलिंगय्या त्याला पाहतो. डॉक्टरना बोलावून उपचार करतो. त्याला आश्चर्य वाटते. बसवलिंगय्या त्याला आपली कहाणी सांगतो. दूरचित्रवाणीचे संच बनवणाऱ्या कारखान्यात नोकरी करणारा तो; कामगार संघटनांच्या वादात कारखाना बंद पडल्याने बायको मुलांना औरंगाबादलाच सोडून पोटासाठी येथे आलेला असतो. आपल्यामुळे वैजनाथला मिळणारी धार्मिक कृत्ये कमी झाली याची त्याला बोच लागते. तो परत गावी जाण्याची तयारी दाखवतो. तेव्हा वैजनाथ त्याला म्हणतो, ''बसवेश्वराने तुम्हाला नेमके इथेच आणले यात त्याचा काहीतरी हेतू असला पाहिजे. फार वर्षापासून मी मायेच्या शब्दाचा भुकेला होतो. इतके दिवस मला वाटायचे की आपल्याला फक्त अन्नाचीच भूक आहे. अन्नाची भूक महत्त्वाची आहेच. पण ममतेची भूकही काही कमी महत्त्वाची नव्हे. तुम्ही येथेच राहा.'' बसवलिंगय्या आपल्या डोळ्यांतील अश्रू आवरत म्हणतो, ''आज मला खरोखरच माझा अकाली गेलेला भाऊ भेटल्यासारखं वाटलं. तुम्ही आता स्वस्थ पडा थोडा वेळ. मी भाताची पेज करतो. तापातून उठल्यावर हलकी म्हणून डॉक्टरांनीच द्यायला सांगितलीय.''

...घरचे लोक परके होतात आणि परके माया करतात. हा चटका लावणारा अनुभव 'भूक'मध्ये पारी आणि बसवलिंगय्या यांच्या आत्मीयतेतून येतो.

'अस्वल' ही या संग्रहातील दीर्घ कथा. ''दुसऱ्याची अशी तारुण्यानं मुसमुसलेली बायको वापरण्यात काहीतरी वेगळंच थ्रिल आहे. पस्तिशी ओलांडली तरी तिशीच्या आतील वाटते. लिरिल साबणाच्या जाहिरातीत असल्यासारखी. सगळं कसं अगदी घट्टघट्ट, रेखीव, प्रमाणबद्ध.

जिथल्या तिथं फिट!'' असे विचार श्रीधरचे बॉस मानेसाहेब सुधाकडे बघत मनात घोळवत असतात. लग्नाच्या वाढदिवशी श्रीधर मानेसाहेबांना आपल्या घरी पार्टी देतो. बरेच पेग पोटात गेल्यावर बेडरूममध्ये जाऊन तो झोपतो आणि मानेसाहेब अस्वलाप्रमाणे आपले केसाळ हात पसरून सुधाला आपल्या कवेत घेतो...''

...लहानकर यांच्या या सर्वच कथांमध्ये उपरोधिक अंत:प्रवाह वाहताना दिसतो. वास्तवाची अंतर्भेदक जाणीव ते मोजक्या प्रतिभांनिशी आणि नेमक्या तात्त्विक भूमिकेनिशी उभी करतात.

बाळासाहेबाला बेशिस्तीबद्दल शाळेत मास्तर मारतात तेव्हा त्याचे पिताश्री सरपंच तात्यासाहेब देशमुख त्या मास्तराची बदली करतात. ''सरपंचाच्या पोराला मारतो लेकाचा! नांगी वर काढली का तिथंच ठेचली पाहिजे. आम्ही गपगुमान बसलो तर उद्या आम्हालाबी हिंग लावून कोणी पुसणार नाही. आज मास्तरनं मारलं, उद्या पोरंबी अंगावर हात टाकायला कमी करणार नाहीत. आज एकजण बाळ्या म्हणाला तर उद्या समदा गाव बाळ्या म्हणणार. गावच्या देशमुखाचा पोरगा हाय त्यो; त्याच्याबरोबर समद्यांनी आब राखूनच बोललं-वागलं पाहिजेच... मोठा आला मास्तर शिस्त लावणारा. त्येला हे बी कळवा की समदा देस आज बेशिस्त झालाय. पैसा अन मनगटशाहीच्या बळावर आज माणूस नुसता आमदार-खासदारच न्हाय तर पाक मंत्र्यापत्तर वर चढतो, तिथं याची दीडदमडीचा शिस्त घेऊन करायचंय काय?'' असे ते आपल्या बायकोजवळ आपले अंतरंग खुले करतात. तेव्हा बायको उद्वेगाने म्हणते, ''आजवर बापाला समज देऊन थकल्ये अन् आता पोराला समज द्याची. बापानं आजवर लय ऐकलं म्हणून आता ल्योक ऐकणार हाय माजं. अन् त्योबी काय म्हणं तर उद्याचा आमदार!'' (९७). 'उद्याचा आमदार' या शीर्षकावरूनच कथेचा उपरोधपूर्ण बाज स्पष्ट होतो. परीक्षेचा अभ्यास कर म्हणून दिनूला त्याच्या बापाने दम देऊन ठेवलेला. आपल्या बापानं बघितलं तर अशी भीती दिनूला वाटते. तेव्हा बाळासाहेब दिनू-पाशा यांना म्हणतो, ''हेच शिकलास का लेका एवढ्या दिवसात? म्या असल्यावर कोणाच्या बाचं भ्या बाळगायचं काय कारण हाय?'' ह्या शब्दांनी दिनूला धीर येतो आणि तो म्हणतो, ''तेबी खरंच हाय म्हणा.'' आणि उद्याच्या आमदारासोबत ते सारेजण फडाच्या दिशेने जाऊ लागतात. (१०५)

आजच्या ग्रामीण भागातील नेतृत्वाचा हा रंगढंग 'उद्याचा आमदार' या कथेत लहानकर मोठ्या चलाखीने पेश करतात.

'अंधारयात्रा' मधील नोकरीला मुकलेला शांताराम उंच कड्यावरून स्वत:ला एका तिरीमिरीच्या क्षणी झोकून देतो. त्याआधी तो परमेश्वराला जाब विचारतो, ''बाप, मुलगा, पती, भाऊ या सगळ्या नात्यांनी आपण कुचकामी ठरलो. जगण्यासाठी नालायक ठरलो. तसं असेल तर हे परमेश्वरा, मग तू मला जन्माला तरी कशाला घातलंस? बरं घातलं तर या अंधारयात्रेचं प्रयोजन काय? बेसावध क्षणी दु:खाचं गाठोडं देऊन आम्हाला जन्माला घालतोस आणि आयुष्यभर आमची होणारी ससेहोलपट बघत बसतोस. नीट कान उघडे ठेवून ऐक. मी हे चालू देणार नाही. तुला काय वाटते? मी मृत्यूला घाबरतो? विसर ते! घाबरत होतो पण आता नाही. तुलाही कुणीतरी अद्दल घडवलीच पाहिजे. कुणीतरी कशाला? मीच घडवतो.''

वेगवेगळ्या पार्श्वभूमी असणाऱ्या, भिन्नविभिन्न जीवनशैली असणाऱ्या अशा कथानकांची व



व्यक्तींची पेशकश लहानकर करतात. त्यांच्या वेगवेगळ्या मानसिकतेचा ते वेध घेतात. प्रत्येक व्यक्ती जीवनविषयक आपला एक दृष्टिकोन घेऊन जगते. आपली मूल्ये जपू पाहते. दारिद्र्याने वा अडचणीने ती कोंडीत सापडते. पण आपले स्वत्व जपू पाहते. त्यामुळे त्या त्या व्यक्तींची दु:खेही वाचकांना भिडतात. त्या त्या व्यक्तीची स्वप्ने वा मूल्ये वाचकांना आवाहक वाटतात.

मराठीतील नव्या पिढीतील, नव्या शतकातील कथाकारांमध्ये एम. डी. लहानकर हे नाव नजिकच्या काळात पहिल्या श्रेणीच्या लेखकात झळकत राहणार याची ग्वाही देणारे हे कथालेखन आहे.

**पृष्ठे** १०५ **किंमत** :७०रु. **सवलतीत** : ६०रु. **सभासदांना** : ५३रु. **पोस्टेज** :१५रु.

प्रिय रसिक वाचक,
आपण आमची अनेक दर्जेदार पुस्तके वाचली आहेत. व नवीन पुस्तकांनाही आपणाकडून भरभरून प्रतिसाद मिळत आहे.
आपणास 'खास' आवडलेल्या आमच्या पुस्तकांबद्दलचा आपला बहुमोल अभिप्राय आम्हास महत्त्वाचा वाटतो. तरी आपला अभिप्राय कळवा.
'मेहता मराठी ग्रंथजगत' मध्ये 'रसिकांची आवड' मधून त्याची 'खास' दखल घेतली जाईल.

आमचा पत्ता — मेहता मराठी ग्रंथजगत
द्वारा मेहता पब्लिशिंग हाऊस,
१२१६, सदाशिव पेठ,
धनश्री अपार्टमेंट, पुणे - ४११०३०
फोन : ४४७६९२४
फॅक्स : ०२० - ४४७५४६२

# झाडवाटा

## आनंद यादव

**ग्रामीण जीवनशैलीत**
**झपाट्याने होणारे परिवर्तन**
**प्रकट करणाऱ्या कथा.**

डॉ. आनंद यादव यांच्या १४ कथांचा झाडवाटा हा संग्रह. झाडवाटा म्हणजे एकेकाळच्या ग्रामीण जीवनाचा अविभाज्य भाग. रानातल्या वाटा. झाडांनी आच्छादिलेल्या वाटा. आज त्यांची जागा डांबरी सडकांनी, महामार्गांनी घेतलीय. जीवनात बदल झालाय.

आनंद यादव या अशा वाटांची बारकाईने नोंद घेतात. ग्रामीण निसर्गाची, शेतीवाडीची, पीक पाण्याची, घरांची, पांदीची, पाणवठ्यांची आवर्जून रंगरूपे न्याहाळतात. त्यांच्यात प्रतीकात्मक जीवनसंघर्ष शोधतात. बऱ्याच वर्षांनी गावाकडे आल्यावर दिसलेल्या बदलांनी त्यांचे कथानायक वा निवेदक सैरभैर होतात. आपण शहरात जाऊन काय मिळवले, काय गमावले याचा मनोमन ताळेबंद मांडतात. कधी हा ताळेबंद स्वत:च्या कर्तृत्वाचा व जीवनप्रणालीचा शहरी यशाच्या धुंदीने वर चढलेला असतो, तर कधी इथल्या निरागस निसर्गरम्यतेच्या सान्निध्यात चौफेर फुललेल्या भावा-बहिणींच्या संसाराकडे बघताना खंतखेदांनी झाकोळलेला असतो. ग्रामीण जीवनात आलेल्या बाजारू संस्कृतीनेही कधी अस्वस्थतेची भावना मनाला सतावते तर कधी या बदलाने आलेल्या नव्या टवटवीत श्रीमंतीने सुखावते. निरीक्षणाचा छंद त्यांना स्वस्थ बसू देत नाही. प्रवासातली वेगवेगळी दृश्ये टिपतानाही त्यांना त्यात कथाबीजे दिसतात. प्रवाशांच्या परस्पर संवादातूनही जीवनाची सूत्रे उमगतात. आपल्या पारंपरिक खानदानीपणाचे पीळ जपणारे जळके सुंभ दिसतात; तसेच लोकलज्जेसाठी आणि परलोकातल्या मुक्तीसाठी निमूटपणे संस्कारविधी करणारे सर्व वर्गातले लोक भेटतात. या बदलत्या ग्रामीण जीवनाच्या वावटळीत जुनी मूल्ये, जुनी माणसे ही कालबाह्य ठरतात; त्यांचे महत्त्व कमी होते; त्यांची गरजही वाटेनाशी होते.

पोटासाठी सारेच जगतात. कधी ऐटीत. तर कधी अगतिकपणे.

डॉ. आनंद यादव या बदलत्या वातावरणात टिकून राहिलेल्या वा टिकू पाहणाऱ्या चिवट परंपरेचा वा मानसिकतेचा धागा घट्ट धरून ठेवताना दिसतात. त्यांच्या श्रद्धा जुन्यावरच रेंगाळतात.



'एक दगडी घराचा इतिहास' या पहिल्याच कथेत शीर्षकात सुचवल्याप्रमाणे परंपरागत ग्रामीण सरंजामी वृत्तीचा पीळदारपणा प्रत्ययाला येतो. जाधवाच्या वळणाजवळच रस्त्याच्या डोसक्यावर पाय देऊन ताठ उभं राहलेलं, काळ्या दगडाच्या रुंद भिंतींचं दुमजली घर; त्याला दोन खिडक्या; आतल्या अंतहीन काळोखातून वस्तीकडे बघणाऱ्या या खिडक्या. गावापलीकडे घरमालकाचा मळा. त्याची राखण करणारा भीमा. आता या भिंतीतल्या दगडांच्या सांदरीतला चुना ठिसूळ होऊन निखळू लागला आहे. (''बुजवलेल्या खिडकीमुळं खुनात डोळा फुटलेल्या जानू पैलवानागत हे घर वाटतं. आसपासची घरं निर्धास्त आहेत. पूर्वी ती वाघाशेजारी बांधलेल्या शेळीगत अंग चोरून बसायची.'' अशा प्रतिमांद्वारे या बदलत्या वातारणाचे वेधक चित्र लेखक वाचकांपुढे उभे करतो.)

भीमा रात्री दारावर दणकट थाप मारत परत येतो. 'सोप्यातल्या खुंटीवरची लालभडक कुंकू लावून बाहेर गेलेली कुऱ्हाड' परत येईपर्यंत किशीला काळजी वाटत असते. भीमा लालभडक सांबार भातावर घेऊन लांडग्यानं कोवळ्या काकेराचे लचके तोडावे तसे भाताचे तोबरे भरतो. ''पाण्याचा तांब्या अपराध्यात खरकट्यात पडलेला.'' हिंसाचाराचे लालभडक रंगरूप प्रकट करणाऱ्या अशा प्रतिमाही येथे येतात. या घराने काही खून पचवलेले आहेत. भीमाला त्याबद्दल अभिमान आहे. एकदा शेत नांगरताना राणोजीवर शेजारी काठ्यांचा पाऊस पाडतात. तो फुटकं डोकं घेऊन घरी येतो. त्याला भीमा म्हणतो, ''कुणाच्या वसाचा हाईस रं सुक्काळीच्या? एखाद्याची मुंडी मुरगाळून तिथंच त्याला मातीत घालायचा न्हाईस काय? फुटकं थोबाड घेऊन मला दाखवायला आलाईस?''

पण पुढं या घराचं तोंड उतरून जातं. विधवा बहिणीची पाळी चुकते. तिला तेथील जमिनीत जागा मिळते.

कूळकायद्याच्या कोर्टकचेऱ्याच्या हेलपाट्यात पाच-सात वर्षे गेली. अपीलावर अपीले. वकिलांची धन. भीमाला त्याची बायको किशी म्हणते, ''मारुती आणि राणोजी दोघींच्या बायका तुमच्या नावानं खडं फोडत्यात. कोर्टकचेऱ्यांनी समदं घर धुवून नेलं म्हणत्यात.'' भीमा संतापतो. वाटण्या होतात. भीमाला मळा, राणूला वाळलं शेत आणि मारुतीला रोख व गहाणवट घर. साठीतला भीमा– एके दिवशी त्याचा खून होतो.

त्याचा मुलगा दिन्या खून करणाऱ्यावर केस घालायला तयार होत नाही का? तर भीमानं त्याच्याकडून मरताना वचन घेतलेले असते. ''कोर्टकचेरी करायची न्हाई. रक्ताचा बदला रक्तानंच घे. तरच माझ्या पोटचा तू खरा बच्चा. खुन्याचं नाव कुणालाही सांगू नगंस. अंगलट येईल. वैरी सावध हुईल.''

मग दिना का थांबलेला आहे?

''पोटाला पोरगा व्हायची वाट बघाय लागलोय. सुरात तीन पोरीच झाल्यात. एक पोरगा झाला तर, मला काळजी न्हाई. बाला दिलेलं वचन खरं करून फाशी जायला मोकळा हुईन.''

लेखक त्याला सांगतो, ''डोक्यातली ही जळमटं काढून टाक. काळ बदललाय. वेगळ्या पद्धतीनं विचार कर. चार मुलं आहेत. त्यांना वाढव. सुखानं राहा.''

तेव्हा दिना सांगतो, ''सायेब, तुम्ही शिकलेली माणसं. तुमची गणितं न्यारी. आमची

गणितं न्यारी. तुमची गणितं आम्हाला पटायची न्हाईत.''

'बाकड्यावरचं जग' या कथेत पुणे ते अमळनेर प्रवासात जे काही दिसले त्याच्या नोंदी आहेत. भोसरीचा कारखान्यांचा परिसर. पुढे सभोवर माळरान. मुरमाच्या टोकड्या. रानटेकड्या. चाकणजवळ कांदे, बटाटे, कोबी, शेंगा भरलेल्या गाड्या. भाजीपाला, बाजाराचा दिवस. गावातून गाडी जाताना दिसलेली शाळेतल्या मुलामुलींची गडबड. वाटेत गाई-बैलांचे चार-पाच तांडे. हे बघताना स्वातंत्र्योत्तर काळातील ग्रामीण समाज या विषयावर द्यावयाच्या भाषणाची टिपणे चाळण्याचे कामही चालू. खेडजवळची हिरवी शेती. गहू, हरभरा, ऊस, ज्वारी, शहरांसाठी लागणारा माल. इंदिरा तलावापुढं जाणीवपूर्वक वाढवलेलं जंगल. कळंबपुढं चाललेलं कालव्याचं काम. कोरडवाहू शेतीला बागायती करणारा प्रकल्प. नवसमाज निर्मितीचं आश्वासन. नारायणगाव जवळचा हिरवागार तृप्त परिसर. फुलांची रानं. गव्हाची रानं. गोफणीनं पाखरं उडवणारे शेतकरी. स्टँडवर झालेली सकाळची न्याहारी. 'बोटा' गावापुढे गाढवांचा घोळका रस्त्यात ठिय्या देऊन बसलेला. पाथरवट जात्यांची पेंड घडवत बसलेला. त्यामुळे घराकडची झालेली आठवण. आईनं जात्यावर दळताना म्हटलेल्या ओव्या... एक असहाय युगच मागच्या बाकड्यावर बसल्याची जाणीव होते; आणि त्या बेचैन अवस्थेत हातातल्या कागदाचा चोळामोळा करून लेखक तो फेकून देतो. तो कागद व्याख्यानाचे मुद्दे लिहिलेला– टिपणांचा असतो. बसच्या प्रवासात दिसणारे बदलते जग– ग्रामीण भागाचे बदलत चाललेले रूप– यांची ही चुणूक.

जीवापलीकडे शेताची आयुष्यभर काळजी घेणाऱ्या म्हाताऱ्या दरूम्माला आपल्या मागं चार मुलं एकत्र राहणार नाहीत याची कल्पना असते. आपल्या मृत्यूचा सोहळा तो मनातच रंगवतो. शेतातल्या चाफ्याच्या झाडाची टपटपणारी फुले बघून आपलं थडगं त्या झाडाखाली बांधावी ही इच्छा तो नातवाला बोलून दाखवतो.

चाफ्याच्या झाडाला फुटलेले कोवळ्या पानांचे अंकुर बघून आजा दरूम्मा आपल्या नातवाला म्हणतो, ''बरं झालं, देवा. वासना पुरी केलीस. आता ह्या झाडाखाली माझी पोरं माझं थडगं बांधूद्यात म्हणजे झालं. खुशाल या सावलीत आडवा हुतो. तिच्या कुशीत झोपून जातो. जलमभर मी हिला सांभाळंल. आता ही मला संभाळंल.'' रानाची शीव धरून लावलेल्या आंब्याच्या झाडांमधील त्या चाफ्याच्या खाली आपलं थडगं आणि त्यावर पडलेली चाफ्याची चार-दोन फुलं हे दृश्य मनापुढं चितारत असतानाच राजगुंड पाटील वारला अशी बातमी येते आणि दरूम्मा आजा पाटलाच्या मर्तिकाला जातो. दरूम्माची बायको आठ-दहा वर्षांपूर्वी गेलेली. घरात तीन सुना. त्यांची चार पोरं. आता घर पोरांचं झालंय; कधीकाळी ते आपलं हुतं हा विचार जाताजाता मनात डोकावतो. अंत्यसंस्काराच्या वेळी दरूम्माच्या मनात येतं. ''पाटलानं एवढं मिळवून ठेवलं; जलमभर गावाला मुरगळत बसला. पाठीमागं एवडा दांडगा गडगंजवाडा ठेवून तसाच निघून गेला.'' घरी परतल्यावर त्याला रात्री भास होतो की आपलं मढं हातरूणात पडलेलं दिसतंय. चौघे लेक धावपळ करताहेत. पण कुणाच्या डोळ्यात पाणी नाही. सुनांना स्वतंत्र राहण्याची इच्छा. पण आपण आजवर एक चूल ठेवली. आता पाडा भित्ती आणि करा चारी बाजूंनी चार दारं... आपल्या अंत्ययात्रेत जुना नांगर, मोडकी गाडी, बायकोचा बळी



घेणारी विहिर, अंगावरची फुलं उधळणारा चाफा, पिकासकट येणारं रान, वाळवी लागलेली झाडं यांचं लटांबर त्याला दिसतं.

सकाळी दरूम्मा उठत नाही; पण त्याच्या चौकशीला कुणी येत नाही. लेक आपापल्या कामाला जातात. सुना आपल्या कामात दंग होतात. थोरला मुलगा फटफटीला किक् देऊन फॅक्टरीच्या दिशेनं तालुक्याच्या वाटेला लागतो. 'मळ्याशेजारून जाणाऱ्या तालुक्याच्या वाटेचा गळा घोटत त्याची मोटारसायकल भरधाव पुढे जाते. झाडांची खेडवळ वाट मागे पडते, राष्ट्रीय महारस्त्याच्या गुळगुळीत डांबरावर तिचा वेग आणखीच वाढतो. रॉकेटच्या गतीनं ती घनगर्द मळ्यापासून दूर दूर जात राहते.''

–'झाडांची रानवाट' या कथेत डॉ. आनंद यादव यांनी एका वयस्कर शेतकऱ्याचे म्हातारपणचे मनोगत याप्रकारे प्रकट केले आहे. बदलत्या जगात त्याला स्थान नाही. मुलांच्या आकांक्षा वेगळ्याच आहेत. रानवाटांऐवजी गुळगुळीत डांबरी महामार्गांचा काळ आता आला आहे.

बँकेच्या जाधव साहेबांच्या आईचे निधन होते. तिच्या अंतिम संस्काराची हकीकत जीवन या कथेत आली आहे. आईच्या आत्म्याला शांती मिळावी म्हणून जाधवसाहेब नदीवर आंघोळ करतात. आपली तलवार कट मिशी काढू देतात. डोक्याचा गोटा करून घेतात. मातीचा डेरा खांद्यावर घेऊन अंडरवेअरवर अंत्ययात्रेत सामील होतात. सर्व विधी साग्रसंगीत पार पाडतात... सरणातून फट करून आवाज आल्यावर सर्वजण मुक्त झाल्यासारखे आळस झटकत उठतात. प्रत्येकाला आपलं घर, जेवण, आपली बायकापोरं दिसू लागतात. घरी जायची ओढ लागते... अंत्यसंस्कारांच्या या वर्णनातून जाधव साहेबांबद्दलच्या भावनांबरोबर शनिवार सगळा वाया जाणार याची खंतही कुठेतरी लोकांच्या मनात दिसते.

'एका गाडीतील प्रवाही'मध्ये प्रवाशांपैकी एका तरुणीकडे पाहून निवेदकाच्या मनात कल्पना येते, वर्तमानपत्राचा अंतरपाट करून एसटीत या तरुणीचं आणि दाढीवाल्या तरुणाचं लग्न लावायचं. लग्न लावून एका बेंचवर शेजारी शेजारी बसवायचं. चुरमुरे फुटाणे अक्षता म्हणून उधळायच्या; गाडी थांबली की सगळ्यांना चहा द्यायचा... पुढच्या स्टॉपवर एक चाळीशीतलं खानदानी जोडपं दोन मुलांसह येतं. बाईच्या सौंदर्याविषयी निवेदकाला आदर वाटतो. दुसरं एक म्हातारं जोडपं पुण्याला नोकरी करणाऱ्या मुलाकडं चाललेले... वगैरे तपशील नोंदवत निवेदक प्रवास सार्थकी लावतो.

पंधरा-वीस वर्षांनी आपल्या गावी आपल्या तीन भावांचा संसार बघायला आलेल्या दत्ताच्या अंतरीची घालमेल व पूर्वस्मृती यांचा आलेख 'पालवी आणि पानगळ' मध्ये बघायला मिळतो. शेतावर सारेजण भेटतात. ते सांगतात : ''तिघास्नी तीन घरं बांधली. तगाई, कर्ज, खतं, उधार मिळाली आणि मळ्यातही मनगंड पीक आलं.'' आंब्याची नवी झाडं, भुतासारखा ऊस, भाज्यांचे वाफे वगैरे बघून दत्ताचा जीव थंडगार होतो. आपलं गाव एवढं बदललेलं– ते आपलं वाटतच नाही. दत्ताला आपल्या जीवनाचा ताळेबंद त्यापुढं फिका वाटायला लागतो. ''आता कोण देणार मला बायको? या वयात? इधवा, पाटाची जरी करून घेतली तरी इटाळ

गेलेलीच मिळणार.'' भावाची बायकापोरं बघून जीव तळमळतो. गोतावळ्यात असतो तर आपल्याही पानंफळं लागली असती. फांद्या फुटल्या असत्या. या विचारांनी तो सैरभैर होतो.

हत्तीच्या कळपाची जंगलात चाललेली जलक्रीडा, झाडांची मुळासकट केलेली उचलबांगडी, मादीबरोबर चाललेली नराची लगट, महागजाचा रुबाब, खोडकर पिल्लावर त्याने सोंडेच्या रपाट्याचा केलेला प्रयोग, एका स्थूल मादीमागे लागलेल्या तरुण नरावर महागजाने चढवलेला हल्ला, चार दिवस त्याला चाऱ्याशिवाय ठेवून नंतर कळपात दिलेला प्रवेश हा सारा हत्तींच्या जीवनशैलीचा पट आनंद यादव यांनी 'नर' या कथेत रेखीवपणे उभा केला आहे.

गरीब जनतेवर कर लादून विकासाच्या नावावर गरीबांनी संपूर्ण निरुपयोगी असलेल्या डांबरी रस्त्यावरून राजकारणी लोकांच्या अलिशान गाड्या धावू लागतात– हे विदारक वास्तव 'नवे वळण' मध्ये उपरोधपूर्ण शैलीत समोर येते.

बाळूमामा सीरियस म्हणून आलेल्या शहरी भाच्याच्या मनातील गडबड गोंधळ 'आंघूळ' या कथेत बघायला मिळतो. ''वास किती मारतोय... ह्येला आंघूळ घाटली पाहिजे. अंगावरच्या चमड्यावर कातीगत खवलं धरत्यात. हातरूणही कवा धुतलंय कुणाला ठावं. सगळं घरच अवघडलेलं... त्येलाच आंघूळ घालाय पाहिजे.'' असं त्याच्या एकेकाळच्या शहरी मित्राला आता वाटतं. त्याला स्वत:ला आंघोळ करायची असते. पण गंगू त्याला म्हणते, ''हे बघ भाऊ. आंघूळ पेटू दे ती आता. नेमानं आंघूळ कराय का भटाबामणाचं हाईसा?... न्हाई आंघूळ दोन दीस केली तर का माणूस मरतंय?... आणि त्याला तसंच शेतावर भात बडवायला जावं लागतं... बाळूमामाच्या मृत्यूनंतर त्याला साग्रसंगीत आंघोळ घालताना बघून, भाच्याच्या डोळ्यांतून ऊन पाणी घळाघळा सांडू लागतं.''

लकवा भरून डावा हात कायमचा कामातनं गेलेला दत्तू घाण्याच्या वजनासाठी ठेवलेल्या दगडावर बसून घाण्याबरोबर तेल गाळत असतो. बसाप्पा तेल्याची बायको त्याला खायला आपून देई ते खाऊन बैलाच्या छपरात जाऊन पडायचं हा त्याचा दिनक्रम. पण बैलघाणीचा धंदा बुडत चालला आणि दत्तूला डच्चू मिळतो. दत्तू नोकरीसाठी इकडेतिकडे हिंडतो. पण कुठच जमत नाही तेव्हा तो पुन्हा बसाप्पाकडे येतो. बसाप्पाच बायको त्याला चहा देते. न्याहारी देते. पोटात भाकरीचा तुकडा जाताच त्याला पुन्हा जगावंसं वाटू लागतं. (पोट).

डॉ. आनंद यादव यांच्या सगळ्याच कथांमध्ये गतकाळची व सद्य:स्थितीची तुलना दिसते. स्मरणरंजन असते; पण आजच्या वास्तवापुढे त्याची झिलई मंदावत जाते. भौगोलिक तपशील टिपण्यात त्यांना रस वाटतो. निसर्गाची रूपेही त्यांना भावतात. अभावामुळं माणसं क्षुद्रपणे वागतात असे काही वेळा दिसते; परंतु ज्यांच्याजवळ भरपूर धनदौलत आहे तेही क्षुद्र मनाने वागतात तेव्हा त्यांना दु:ख वाटते. या सर्वच कथांतून एक हताश हळहळ व्यक्त होते. वास्तवाशी नाळ नीट जुळवणे अवघड होते. मध्यमवर्गीय मूल्यांचे वर्चस्व जुन्या ग्रामीण जीवनशैलीला निष्प्रभ ठरवत राहते. काळ बदलतो. माणूसही बदलतो. माणुसकीचे मोलही हरपते.

**पृष्ठे** १३९ **किंमत** :९०रु. **सवलतीत** : ७७रु. **सभासदांना** : ६८रु. **पोस्टेज** :१५रु.



# फुले आणि काटे

## ऐक महाराष्ट्र तुझी कहाणी

आटपाट नगर होतं. तिथं एक राजा होता. त्याला दोन आया होत्या. एक भवाई. एक जिजाई. जिजाई होती. विदर्भाची, भवाई होती जगाची. राजाजीनं स्वराज्य आणलं. राजाजीनं सुराज्य आणलं. काळ काय थांबतो? हळूहळू लोक त्याची शिकवण विसरले. साम्राज्याच्या गोष्टी करू लागले. दुही माजली. सावकाराचं देणं वाढलं. तरी विलास चालू राहिले. धर रे हिला धर रे तिला. पैशासाठी मुलूखगिरी. सारा मुलुख वैरी. घात झाले. आघात झाले. अपघात झाले. विश्वासघात तर विचारूच नका. दीड लाख बांगडी पिचली. सुंभ जळाला. पीळ तसाच हा प्रदेश माझा. तोही माझाच. देशाचे भान नाही. भाषा श्रेष्ठ माझीच फक्त हा भाषक माझा नाही. तो भाषक माझा नाही. श्रेष्ठ फक्त मीच एक. ज्येष्ठ फक्त मीच एक. ऐका लोकहो, माझेच ऐका. मी मालक. तुम्ही गुलाम. तुम्ही करा माझेच काम. ओटा तुमचा तुमचे सूप. तुमचे पोहे खाऊ खूप. कचरा किती करता राव. चला आवरा चले जाव. मार्चमध्ये उन्ह फार, संत्री द्या उष्मा फार. रद्दड लोक, मद्दड लोक. करून तुम्ही करणार काय? झोपा काढता पसरून पाय. एप्रिलमध्ये उन्ह फार आणा एसी आणा कार. कसे जगता इथे तुम्ही सांगतो युक्ती एक नामी. बोलता कसे पानी-लोनी. 'व्हता' नको 'नव्हता' चालेल. 'माय' नको 'ममी' चालेल. 'नास' नको 'हास' चालेल. 'येतो' नको 'जातो' चालेल. हिंदी नको. इग्रंज चालेल. त्यांच्या जागी आम्ही आहोत. तुमची काळजी वाहत आहोत. उन्हात राबून काळे तुम्ही. काळ्यांना तर अक्कल कमी. कशास हवे राज्य तुम्हा. ऐकून ऐकून कान किटले. जिजाईचे पूत उठले. बस्स यार बस्स बकवास. इंग्रज गेले तुम्ही जा. आम्ही राजे आम्ही प्रजा. ऐक राष्ट्रा तुझी कहाणी. तुझीच म्हणू आम्ही गाणी. तुझे गाणे वऱ्हाडी, तुझे गाणे मराठी, तुझे गाणे हिंदवी, तुझे गाणे हिंदीही, सातपुडा हा इथे बहरला सात नद्यांचा मेळा। छत्तीसचा ना भाव कुणाशी। हैदर वा भोपाला।। होता होता होऊन गेले गरीबाचे घरकुल। दर्भ तृणाला 'कुश' म्हणती अन् खुडणारा तो 'कुशल'। त्या दर्भाच्या समिधा होती चेतविती स्थंडिल। दर्भाचा समिधा होती चेतविती स्थंडिल। दर्भाचा हा विशेष जेथे 'विदर्भ' म्हणती त्याला। सप्तसुरांचा सातपुडा अन् माहा विदर्भही राष्ट्रभक्तीच्या ज्वाला इथे चेतल्या जगी पसरल्या माधव मोहनमाळा। भीमशक्तीचा गिरिधर येथे मुरलीधरही जागा। नरहरीचा अन् पुत्र मागतो तीन पदांची जागा।। असा घेतला वसा जयांनी तया कुणीही फसवू नका। नव्या जगाचा उदय होतसे उठी गोविंदा रमा नायका।। जागो जननाथकुंवर। पंछीजल बोले. जागो शिवनाथकुंवर। जनपंछी बोले। काला नभ नील होता। प्राचीपर केसरिया। धवल तेज विलसित है। सूर्यबिंब रक्तिमसा।। जागो शिवनाथ-कुंवर चौरागर बाहे। त्रिंबक के नेत्रोसे जग शिवमय कर दें। जागो शिवनाथकुंवर बंदीजन बोले। जागो जननाथकुंवर बंदीजन बोले।।

डॉ. द. भि. कुलकर्णी
(लोकमतवरून)

**(साहित्यवार्ता पान नं. १२ वरून)**

## जीवनप्रेरणा व विनोदाचा निकटचा संबंध :

''माणसाची जीवनप्रेरणा कमालीची गुंतागुंतीची असते. त्यामध्ये सुखात्म जाणिवेची प्रेरणा त्याचे जीवन सुसह्य करते. म्हणून जीवनप्रेरणा आणि विनोद यांचा जवळचा संबंध आहे.'' असे मत ज्येष्ठ समीक्षक डॉ. गो. मा. पवार यांनी पुणे येथे व्यक्त केले.

पुणे विद्यापीठाचा मराठी विभाग आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे आयोजित प्रा. रा. श्री. जोग स्मृती व्याख्यानमालेत 'विनोदमीमांसा' या विषयावर डॉ. पवार बोलत होते. डॉ. सिग्मंड फ्रॉईड, ब्रेसॉ, आर्थर कोस्लर यांनी विनोद, त्यातील प्रकार, उपहास, कोटी यासंदर्भात मांडलेल्या विचारांचा आढावा घेत डॉ. पवार म्हणाले, ''कोटी करताना त्यात समोरच्याला तुच्छ मानून त्याच्यावर आक्रमण करण्याची भावना मुख्य असते, असे मत फ्रॉईड याने मांडले होते, तर कोटीमध्ये अन्य भावनांनाही महत्त्वाचे स्थान असल्याचे दाखले ज्येष्ठ साहित्यिक पु. ल. देशपांडे, विद्याधर पुंडलिक यांनी दिले आहेत. त्याचप्रमाणे फ्रॉईडने दिलेल्या कोटीच्या उदाहरणांच्या विश्लेषणात आक्रमकपणातून विनोदनिर्मिती होत नसल्याचे स्पष्ट होत नाही.''

''जे व्यंग जीवनात अडथळा निर्माण करते, त्यावर उपहासाद्वारे प्रहार केला जातो. त्यातून विमुक्ततेचा प्रत्यय येतो,'' असे सांगून, ''नुसत्या अभिवैशिष्ट्यातून विनोदनिर्मिती होत नाही, तर आशयाच्या पातळीतूनही निर्मिती होते, वेगवेगळ्या पातळ्यांवरील दोन परस्परविरोधी विचारांमधील विसंगती स्पष्ट करण्याचे साधन म्हणजे विनोद अथवा विनोदात्मकता होय.'' असेही ते म्हणाले.

## मराठी कवितेचा अमेरिकी चाहता

मराठी कविता सातासमुद्रापार अमेरिकेच्या अध्यक्षांच्या घरी पोचली आहे. कवी आहे पुण्यातलाच आणि कविता अमेरिकेला पोचली. बिल क्लिंटन, आकुर्डीत रूपेश कॉलनीत राहणाऱ्या बी. एस. बनसोडे यांनी नववर्षाच्या शुभेच्छा देताना अमेरिकेच्या अध्यक्षांना आपला 'जीवनगाणे' हा काव्यसंग्रह पाठविला होता. जग हे एखाद्या गावासारखे जवळ येत असताना एका मराठी कवीने पाठविलेला काव्यसंग्रह क्लिंटन साहेबांना भावला असावा. त्यातच भारत दौऱ्यावरून परत गेल्या गेल्या हा कवितासंग्रह त्याच्या हाती पडला असावा. बिलसाहेबांनी स्नेहपूर्वक कवी बनसोडे यांनी पत्रही लिहिले, ''Thank you so much for your kind gift. I appreciateyour thoughtfulness and your generosity' बसतील.

## साहित्याच्या आकलनासाठी अनुभवाची कसोटी

'वाचनातून माणूस घडतो, असे म्हटले जात असले तरीही प्रत्येक साहित्यकृती लिहिणाराचा, त्याच्या उद्देशाचा विचार करूनच तिचे वाचन व्हावे, ते करताना अनुभवाच्या कसोटीवर त्यातील विचार पारखून घ्यावेत,' असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. आ. ह. साळुंखे यांनी सातारा ग्रंथ महोत्सवात व्यक्त केले.

जिल्हा ग्रंथ महोत्सव समितीच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या 'वाचनातून घडतो माणूस'



या विषयातील परिसंवादात बोलताना डॉ. साळुंखे आपल्या भाषणात पुढे म्हणाले, 'वाचनातून माणूस घडतो असे म्हटले जात असले तरीही तो बऱ्याचदा बिघडतो. आजही पन्नास कोटी लोक निरक्षर आहेत. त्यांच्या आशा-आकांक्षांचे लेखन अद्यापि परिपूर्ण झालेले नाही. पुस्तके वाचताना व त्यांची निवड करताना ती कुणी, कोणत्या उद्देशासाठी लिहिली हे तपासून पाहिले पाहिजे. कारण बऱ्याचदा आकृष्ट करणारे, अत्यंत प्रभावी भाषेत लिहिलेले लेखन हे विषारी विचाराने भरलेले असते. त्यामुळे वाचन हे डोळसपणे व्हायला हवे. असा डोळसपणा दाखविला तरच आपली पुढची पिढी अंधकारापासून वाचू शकते. अन्यथा मेंदूला बधिर करणाऱ्या, विवेकशक्तीला ठेचणाऱ्या बाबींचे समर्थन आपणांकडूनच होऊ शकते.'

अध्यक्षस्थानावरून बोलताना ज्येष्ठ समीक्षक शंकर सारडा म्हणाले, 'आजचे युग माहिती-तंत्रज्ञानाचे असून आपण जागतिक ज्ञानसमाजाचे सदस्य आहोत. अजूनही मोठा समाज ज्ञानापासून वंचित आहे, अशा परिस्थितीत ज्ञान देणे, वाचनाची गोडी लावणे ही अवघड बाब आहे. तरीही हे काम करणे आवश्यक आहे. अलीकडच्या काळात माझे स्वत:चे निरीक्षण असे आहे की, मुलांमध्ये विविध तऱ्हेच्या वाचनाची भूक वाढत आहे. त्यांच्या गरजेनुरूप लेखन व्हायला हवे. पालकांनीही आपली मुले ज्ञानाच्या कोणत्याही शाखेपासून वंचित राहायला नकोत त्यादृष्टीने प्रयत्न केले पाहिजेत.'

बॅ. पी. जी. पाटील आपल्या भाषणात म्हणाले, 'ज्ञानसाधना ही न संपणारी गोष्ट आहे. ग्रंथवाचन हा अनेकांचा ध्यास असतो. त्यातूनच व्यक्तिमत्त्वाला आकार मिळत असतो. महात्मा गांधींच्या आपल्या आत्मचरित्रात अनेक ग्रंथांनी आपल्यावर मोहिनी टाकल्याचे लिहिले आहे. रँग्लर परांजपे, आचार्य भागवत, आचार्य जावडेकर यांची आपण ऐकलेली व्याख्याने त्यांच्या व्यासंगाची साक्ष देत असत.'

ग्रामीण कादंबरीकार व. बा. बोधे म्हणाले, 'पुस्तके माणसाला अंतर्मुख करीत असतात. ती जगण्याला बळ देत असतात. आपण आपली साहित्यनिर्मिती उपेक्षितांना न्याय देण्यासाठी प्रयत्नशील राहील हे पाहिले आहे.'

प्रारंभी महोत्सव समितीचे सदस्य प्रा. पुरुषोत्तम शेठ यांनी स्वागत केले. प्रा. यशवंत पाटणे यांनी प्रास्तविक तर मधु नेने यांनी सूत्रसंचालन केले.

**अक्षय सुखाचे वरदान : रेकी**

**नीलम दोशी**

वैश्विक शक्तीच्या चैतन्यानं माणसाच्या शरीररात दडलेल्या विविध क्षमता स्पर्शचारातून जागृत करणाऱ्या प्राचीन भारतीय उपचार पद्धती विषयी सर्व काही------

किंमत : ६०रु. सभासदांना : ४५रु. पोस्टेज : १५रु.

## मेहता पब्लिशिंग हाऊस यांनी
## १९९९ मध्ये प्रकाशित केलेली पुस्तके

| पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत |
|---|---|---|
| **कादंबरी** | | |
| काशभट | मंगेश पदकी | ७०/- |
| प्रवाहातील तारू | सु. वि. सुंठणकर | १२५/- |
| द प्रॉडिगल सन | अनु. मंगला निगुडकर | २००/- |
| नॉट अ पेनी मोअर, नॉट अ पेनी लेस | अनु. अंजनी नरवणे | १२०/- |
| द फोर्थ के | अनु. वनिता सावंत | २००/- |
| अणसार | अनु. अंजनी नरवणे | १८०/- |
| ऑपरेशन गुलमोहर | अनु. शरयु पेडणेकर | १५०/- |
| मंदिरा | अनु. तारा पंडित | १२५/- |
| काँगो | अनु. अरुण मांडे | १६०/- |
| **कथासंग्रह** | | |
| आत्मवेध | निरंजन घाटे | १२०/- |
| खिडकीलाही डोळे असतात | डॉ. बाळ फोंडके | ११०/- |
| विज्ञान विशेष | डॉ. बाळ फोंडके | ११०/- |
| सावित्रीचा निर्णय | नागनाथ कोत्तापल्ले | १००/- |
| कावळे आणि माणसं | उत्तम कांबळे | ११०/- |
| प्रवाह | पांडुरंग कुंभार | ८०/- |
| उत्तरार्ध | विजया राजाध्यक्ष | १२५/- |
| निसटलेले | आशा बगे | १००/- |
| ऋतुवेगळे | आशा बगे | ६०/- |
| खसखशीचा मळा | द. ता. भोसले | ७५/- |
| मुळे आणि पाळे | वसंत नरहर फेणे | ८०/- |
| झुंज कॅन्सरशी | द. कृ. गोसावी | ६०/- |
| शेष अवशेष | अरविंद रे | १२५/- |
| **ललितगद्य** | | |
| जागल्या | दया पवार | ५०/- |
| लाइफ स्टाइल | सुधीर गाडगीळ | १२०/- |
| रंगरेषा | शान्ता ज. शेळके | ७५/- |
| मद्य नव्हे हे मंतरलेले पाणी | संपा. अरुण शेवते | १२०/- |



| | | |
|---|---|---|
| **वैचारिक साहित्य** | | |
| ध्यानसूत्र : ओशो | अनु. माधव कर्वे | १००/- |
| मी धार्मिकता शिकवितो धर्म नाही : ओशो | अनु. मृणालिनी गडकरी | ९०/- |
| नष्ट मेयेर नष्ट गद्य | अनु. मृणालिनी गडकरी | १२०/- |
| **राजकीय** | | |
| द वर्ल्ड ऑफ फतवा | अनु. भारती पांडे | ३००/- |
| **प्रवासवर्णन** | | |
| एकला चलो रे | दया पवार | ५०/- |
| **आरोग्यविषयक** | | |
| हृदयविकार निवारण | शुभदा गोगटे | १५०/- |
| भारतवैद्यक | डॉ. शाम अष्टेकर | ६००/- |
| **मार्गदर्शनपर** | | |
| तुम्ही आणि तुमचं वैवाहिक जीवन | अनु. प्रमोद संभूस | ७०/- |
| निवृत्त ज्येष्ठ नागरिकांसाठी उद्योग व्यवसाय | गंगाधर महाम्बरे | ४०/- |
| **क्रीडाविषयक** | | |
| क्रीडाज्ञानकोश | सुरेशचंद्र नाडकर्णी | ६००/- |
| **विज्ञानविषयक** | | |
| पर्यावरण संतुलनासाठी हिरवं सोनं | डॉ. सरिता पटवर्धन | ६०/- |
| नवचैतन्याचा झरा | अनु. प्रमोद जोगळेकर | ६५/- |
| **काव्य** | | |
| वि. स. खांडेकरांची कविता | संपा. अविनाश आवलगावकर | १३०/- |
| किनारे मनाचे : शान्ता शेळके | संपा. प्रभा गणोरकर | १००/- |
| **संदर्भ ग्रंथ** | | |
| मराठी रोमँटिक काव्यप्रतिभा | प्रा. रमेश तेंडुलकर | १३०/- |
| मराठी ग्रामीण कवितेचा इतिहास | कैलास सार्वेकर | २००/- |
| **चरित्रे / व्यक्तिचरित्रे** | | |
| रेशीमगाठी | कांचन घाणेकर | १००/- |
| महात्मा (जोतीराव फुले) | डॉ. रवींद्र ठाकूर | ३००/- |

## बालवाङ्मय

| | | |
|---|---|---|
| पंचतंत्रातील मनोरंजक गोष्टी | अनिल किणीकर | २०/- |
| पंचतंत्रातील बोधपर गोष्टी | अनिल किणीकर | २०/- |
| पंचतंत्रातील रोचक गोष्टी | अनिल किणीकर | २०/- |
| पंचतंत्रातील प्रेरक गोष्टी | अनिल किणीकर | २०/- |

## नाटके

| | | |
|---|---|---|
| नको स्वातंत्र स्त्रीला | दिलीप परदेशी | ५०/- |
| दिवस फार चांगले आहेत | विद्याधर पुंडलिक | ४०/- |
| श्रद्धा | विद्याधर पुंडलिक | ५०/- |
| कुणीकडून कुणीकडे | विद्याधर पुंडलिक | ४०/- |
| भैरवी | दिलीप परदेशी | ५०/- |

## समीक्षा

| | | |
|---|---|---|
| मराठी ग्रामीण साहित्य परिसर आणि प्रवाह | गो. म. कुलकर्णी | ४०/- |

## भूगोल

| | | |
|---|---|---|
| प्राकृतिक भूगोल | के. ए. खतीब | ७०/- |
| भारताचा भूगोल | के. ए. खतीब | १३०/- |

**कादंबरी**

*मंदिरा*

अनु.: तारा पंडित

किंमत : १२५/-

**कथासंग्रह**

*शेष अवशेष*

लेखक : अरविंद रे

किंमत : १२५/-

**चिंतन**

*ध्यानसूत्र : ओशो*

अनु. : माधव कर्वे

किंमत : १००/-



# मेहता पब्लिशिंग हाऊस यांनी
# २००० मध्ये प्रकाशित केलेली पुस्तके

| पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत |
|---|---|---|
| **कादंबरी** | | |
| सुंदरबनच्या जंगलात | अनु. तारा पंडित | ६०/- |
| फॅक्टरी गेट | रंगा मराठे | १५०/- |
| द फिस्ट ऑफ गॉड | अनु. अनिल काळे | ३००/- |
| ज्युरॅसिक पार्क | अनु. प्रमोद जोगळेकर | २५०/- |
| क्रोमोझोम - ६ | वैशाली जोशी | ३५०/- |
| प्रार्थना | माधवी देसाई | १२५/- |
| गाजव्यथा | एम् .डी. लहानकर | १००/- |
| वेगळ्या वाटा | पांडुरंग कुंभार | ७०/- |
| तीन दगडाची चूल | विमल मोरे | १५०/- |
| **कथासंग्रह** | | |
| मुंबई...मुंबई | अनु. नारायण आवटी | १५०/- |
| भूमिकन्या | आनंद यादव | ९०/- |
| कातरवेळ | एम. डी. लहानकर | ७०/- |
| पोस्टमार्टेम | प. बा. सामंत | १२५/- |
| गुंता सोडविताना | अनुराधा गुरव | ११०/- |
| द्वंद्व | अनु. वनिता सावंत | १५०/- |
| इस्कोट | उत्तम बावस्कर | ७०/- |
| नक्षत्रांच्या प्रकाशात | विजया जहागिरदार | १००/- |
| **ललित** | | |
| रानातील प्रकाश | विजय पाडळकर | ६०/- |
| आठवणींचा मोहर | राजाभाऊ गवांदे | २००/- |
| हितगुज | अनु. वृंदा दाभोळकर | १६०/- |
| सिलेक्टिव्ह मेमरी | अनु. अपर्णा वेलणकर | ३३०/- |
| कविता स्मरणातल्या | शान्ता शेळके | १००/- |
| स्मरण विस्मरण | नामदेर कांबळे | १२५/- |
| उद्याच्या सुंदर दिवसांसाठी | नागनाथ कोत्तापल्ले | १००/- |
| चिंतनाच्या वाटा | निर्मलकुमार फडकुले | ९०/- |
| **शब्दकोश** | | |
| पर्याय शब्दकोश | वि. श. ठकार | ३००/- |

## संकीर्ण

| | | |
|---|---|---|
| ड्रिंक्स व कॉकटेल्स | डॉ. जयंत नरवणे | १२५/- |
| आय सी ८१४ अपहरणाचे १७३ तास | अनु. लीना सोहोनी | १२०/- |

## मार्गदर्शनपर

| | | |
|---|---|---|
| ज्ञानदा निबंधमाला | दिपाली पोरे-वेल्हाळ | ११०/- |
| आपले सौंदर्य आणि त्याची निगा | अनु. मीना टाकळकर | १००/- |
| सुखद मातृत्व | रत्नावली दातार | ५०/- |
| घरातील बाग | आ. बा. पाटील | १००/- |
| स्वभावाला औषध आहे | डॉ. रमा मराठे | १००/- |
| उत्तम स्मृतीचा कानमंत्र | चारुलता पाटील | ५०/- |
| मुलांच्या समृद्ध जीवनासाठी | सुचित तांबोळी | १००/- |
| रेकी | शुभदा दामले | ६०/- |
| फक्त खेळण्यांसाठी | डी. एस. इटोकर | ६०/- |
| करोडोंचे सामान्यज्ञान | सुनीता दांडेकर | ८०/- |

## वैचारिक

| | | |
|---|---|---|
| ग्रामसंस्कृती | आनंद यादव | १२५/- |

## संदर्भ

| | | |
|---|---|---|
| स्वामी : एक शोध | मीरा घांडगे | १५०/- |

## नाटक

| | | |
|---|---|---|
| श्रद्धा | विद्याधर पुंडलिक | ५०/- |
| कुणीकडून कुणीकडे | विद्याधर पुंडलिक | ४०/- |

## बालवाङ्‌मय

| | | |
|---|---|---|
| हितोपदेश मनोरंजक | मोहन वेल्हाळ | २०/- |
| हितोपदेश प्रेरक | मोहन वेल्हाळ | २०/- |
| हितोपदेश बोधपर | मोहन वेल्हाळ | २०/- |
| हितोपदेश रोचक | मोहन वेल्हाळ | २०/- |
| सैनिक हो तुमच्यासाठी | आनंद यादव | २०/- |

## शिक्षण

| | | |
|---|---|---|
| मूल्यशिक्षण | डी. एस. कांबळे | ७०/- |

## विज्ञान

**शरीरातील विविध संस्था**

| | | |
|---|---|---|
| भाग १ | अनु. वैशाली जोशी | २५/- |
| भाग २ | अनु. वैशाली जोशी | २५/- |
| भाग ३ | अनु. वैशाली जोशी | २५/- |



**चला प्रयोग करू या**

| | | |
|---|---|---|
| मोजमापे | मीना किणीकर | २०/- |
| ध्वनी | मीना किणीकर | २०/- |
| गतिचलन | मीना किणीकर | २०/- |
| हवास्थिती | मीना किणीकर | २०/- |
| अवकाश | मीना किणीकर | २०/- |
| पदार्थ | मीना किणीकर | २०/- |
| हवा | मीना किणीकर | २०/- |
| रसायने | मीना किणीकर | २०/- |
| परिस्थितीशास्त्र | मीना किणीकर | २०/- |
| अन्न | मीना किणीकर | २०/- |
| उष्णता | मीना किणीकर | २०/- |
| ऊर्जा | मीना किणीकर | २०/- |

**तंत्रज्ञानाचे विश्व**

| | | |
|---|---|---|
| माहिती प्रसार साधने, दळणवळण/वाहतूक | निरंजन घाटे | २०/- |
| संगणक, यंत्रमानव | निरंजन घाटे | २०/- |
| मानवी युद्धसाधने, लेझर्स | निरंजन घाटे | २०/- |

## कविता

| | | |
|---|---|---|
| निर्बाचित कबिता | अनु. मृणालिनी गडकरी | ७०/- |

## राजकीय

| | | |
|---|---|---|
| भारतीय राजकारणातील गुन्हेगारी व भ्रष्टाचार | माधव मोर्डेकर | २००/- |
| शिलंगणाचं सोनं | कुमार केतकर | २५०/- |

# २००० सालातील नवीन आवृत्त्या

| पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत | आवृत्ती |
|---|---|---|---|
| **कादंबरी** | | | |
| स्वामी | रणजित देसाई | ९०/- | २१ |
| राधेय | रणजित देसाई | १००/- | १० |
| पावनखिंड | रणजित देसाई | १००/- | ४ |
| माझा गाव | रणजित देसाई | १५०/- | २ |
| पहिले प्रेम | वि. स. खांडेकर | ९०/- | ८ |
| लज्जा | अनु. लीना सोहोनी | १२५/- | ४ |
| देव जो भुवरी चालिला | अनु. लीना सोहोनी | १००/- | २ |
| पर्व | अनु. उमा कुलकर्णी | २५०/- | ३ |
| चीपर बाय द डझन | अनु. मंगला निगुडकर | १००/- | ४ |

## कथासंग्रह

| | | | |
|---|---|---|---|
| प्रपात | रणजित देसाई | ९०/- | २ |
| आस्तिक | वि. स. खांडेकर | ६५/- | ४ |
| पाकळ्या | वि. स. खांडेकर | ७०/- | ४ |
| हिरवळ | वि. स. खांडेकर | ५०/- | ३ |
| ढगाआडचे चांदणे | वि. स. खांडेकर | ६०/- | ५ |
| घरजावई | आनंद यादव | १००/- | ४ |
| मोडेन पण वाकणार नाही | व. पु. काळे | ७०/- | ६ |

## काव्य

| | | | |
|---|---|---|---|
| वर्षा | शान्ता ज. शेळके | ७०/- | २ |
| कोंडवाडा | दया पवार | ४०/- | ४ |

## ललित

| | | | |
|---|---|---|---|
| माझं माझ्यापाशी | व. पु. काळे | १००/- | २ |
| आपण सारे अर्जुन | व. पु. काळे | ८०/- | ५ |
| सांगे वडिलांची कीर्ती | व. पु. काळे | ७०/- | ५ |
| लाईफ स्टाइल | सुधीर गाडगीळ | १२०/- | ३ |
| रेशीमगाठी | कांचन घाणेकर | १००/- | २ |
| कांचनकण | शिवाजी सावंत | ७०/- | २ |
| शेलका साज | शिवाजी सावंत | १२०/- | ३ |

## प्रवास

| | | | |
|---|---|---|---|
| माझं लंडन | मीना प्रभु | २२५/- | ४ |
| दक्षिणरंग | मीना प्रभु | २५०/- | २ |

## अनुभवकथन

| | | | |
|---|---|---|---|
| इट्स ऑलवेज पॉसिबल | अनु. लीना सोहोनी | २५०/- | १ |

## चरित्रे/व्यक्तिचित्रे

| | | | |
|---|---|---|---|
| मोरावळा | शिवाजी सावंत | ६०/- | २ |
| नाथ हा माझा | कांचन घाणेकर | २५०/- | ६ |
| बिझिनेस महाराजे | अशोक जैन | २५०/- | २ |

## वैचारिक

| | | | |
|---|---|---|---|
| युगंधर श्रीकृष्ण | शिवाजी सावंत | ६०/- | २ |
| एक एक पाऊल (ओशो) | अनु. भारती पांडे | ८०/- | २ |
| हसत खेळत ध्यानधारणा | अनु. मीना टाकळकर | ७०/- | २ |



## राजकीय

| | | | |
|---|---|---|---|
| वॉर्सा ते हिरोशिमा | वि. स. वाळिंबे | २५० | ४ |

## सामाजिक

| | | | |
|---|---|---|---|
| जाती-जमाती | रामनाथ चव्हाण | ९० | ३ |

## मार्गदर्शन

| | | | |
|---|---|---|---|
| बुद्धिबळ शिका | ना. रा. वडनप | १०० | ४ |
| एक विजयपथ | अविनाश धर्माधिकारी | १५० | ४ |
| महिलांसाठी उद्योग व्यवसाय | गंगाधर म्हाम्बरे | ९० | २ |
| ध्यानसूत्र | माधव कर्वे | १०० | २ |
| छंदातून विज्ञान | डी. एस. इटोकर | ६० | ४ |
| सभेत कसे बोलावे | शाम भुर्के | ५० | ५ |
| नागरिक | अविनाश धर्माधिकारी | १५० | २ |
| मुलांवरचे संस्कार | श. व्य. काश्यपे | ८० | ३ |

## नाटक

| | | | |
|---|---|---|---|
| गगनभेदी | वसंत कानेटकर | ६० | २ |
| अखेरचा सवाल | वसंत कानेटकर | ५० | ४ |
| जिथे गवतास भाले फुटतात | वंसत कानेटकर | ६० | २ |
| आकाशमिठी | वसंत कानेटकर | ६० | २ |

## विज्ञान

| | | | |
|---|---|---|---|
| पर्यावरण प्रदुषण | निरंजन घाटे | १३० | ३ |

## आरोग्य

| | | | |
|---|---|---|---|
| हृदयविकार निवारण | शुभदा गोगटे | १५० | ४ |
| बाल परिचर्या | सुधा पाटील | १५० | ३ |

## पाकशास्त्र

| | | | |
|---|---|---|---|
| रुचिरा भाग-१ | कमलाबाई ओगले | ९० | ३६ |
| रुचिरा भाग-२ | कमलाबाई ओगले | ९० | ११ |

## शेतकी

| | | | |
|---|---|---|---|
| सुंदर आपली फळबाग | आ. बा. पाटील | ८० | ३ |
| बोन्साय | आ. बा. पाटील | ७५ | २ |
| विपुलाच सृष्टी | श्री. अ. दाभोळकर | ६५ | ६ |
| आधुनिक द्राक्ष लागवड | श्री. अ. दाभोळकर | ७० | ५ |

## संदर्भ

| | | | |
|---|---|---|---|
| मराठीचे व्याकरण | लीला गोवीलकर | २२५ | ३ |
| मराठी व्याकरण परिचय | राजशेखर हिरेमठ | ८० | ३ |

## मेहता पब्लिशिंग हाऊस यांनी
## २००१ मध्ये प्रकाशित केलेली पुस्तके

| पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत |
|---|---|---|
| **कादंबरी** | | |
| कांचनगंगा | माधवी देसाई | १५०/- |
| इथे फुलांना मरण जन्मता | द. ता. भोसले | ८०/- |
| ज्युरॅसिक पार्क | अनु. प्रमोद जोगळेकर | २५०/- |
| क्रोमोझोम - ६ | अनु. वैशाली जोशी | ३५०/- |
| द मिरॅकल | अनु. जयवंत चुनेकर | ३००/- |
| द लास्ट डॉन | अनु. अनिल काळे | ३५०/- |
| द कंपनी ऑफ विमेन | खुशवंत सिंग | २००/- |
| **कथासंग्रह** | | |
| भूमिकन्या | आनंद यादव | ९०/- |
| झाडवाटा | आनंद यादव | ९०/- |
| गहाण पडलेली टेकडी | अनु. अंजनी नरवणे | १२०/- |
| **ललितगद्य** | | |
| सुखशांतीच्या शोधात | अंजली ठकार | १००/- |
| **वैचारिक** | | |
| नवी पहाट : ओशो | अनु. प्रज्ञा ओक | १००/- |
| ख्यातनाम इतिहासकार | अनु. सुधा नरवणे | १५०/- |
| **संकीर्ण** | | |
| कारगिलनामा | अनु. नारायण आवटी | १६०/- |
| कोटिमोलाची प्रश्नोत्तरे | उमा खरे | ७०/- |
| **आत्मचरित्र** | | |
| आमार मेयेबेला (तसलिमा नासरिन) | अनु. मृणालिनी गडकरी | २००/- |
| **आरोग्यविषयक** | | |
| अक्षय सुखाचे वरदान - रेकी | नीलम दोशी | ६०/- |
| **विज्ञानविषयक** | | |
| जिज्ञासापूर्ती | निरंजन घाटे | १५०/- |
| विज्ञानाचे शतक | निरंजन घाटे | २००/- |
| नामशेष झालेले प्राणी | किशोर पवार | ५०/- |
| **काव्य** | | |
| वारा आणि कमळ | मीरा | ६०/- |
| **संदर्भ** | | |
| स्वामी : एक शोध | संपा. डॉ. मीरा घांडगे | १५०/- |



# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ मार्च २००१
◆ वर्ष पहिले
◆ अंक पाचवा

— *अनुक्रमणिका* —


| | |
|---|---|
| **संपादकीय -** | २ |
| **साहित्यवार्ता** | ५ |
| **पुरस्कार** | १३ |
| **नवीन स्पर्धा** | १६ |
| **श्रद्धांजली** | १७ |
| **पुस्तक परिचय** | |
| ज्युरॅसिक पार्क | १८ |
| सुखशांतीच्या शोधात | २२ |
| क्रोमोझोम - ६ | २६ |
| कातरवेळ | ३१ |
| झाडवाटा | ३६ |
| **फुले आणि काटे** | ४१ |


- संपादक : सुनील मेहता
- कार्यकारी संपादक : शंकर सारडा
- संपादन सहाय्य : सुनीता दांडेकर
- अंकाची किंमत १० रु.
- वार्षिक वर्गणी ८० रु. तीन वर्षांची २००रु. पाच वर्षांची ३००रु.
- वार्षिक वर्गणी मनीऑर्डरने पाठवावी.
- प्रसिद्धी दरमहा १५ तारखेस

- मांडणी-अक्षरजुळणी : ***मेहता पब्लिशिंग हाऊस***
- संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता, १२१६ सदाशिव पेठ,धनश्री अपार्टमेंटस्, पुणे-३०. फॅक्स : ०२०-४४७५४६२

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*